श्री साइनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें.] श्रावण शके १८४८ [अंक ६.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी
प्रकाशक:—रामचंद्र आत्माराम तर्खड
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| स्फुट विषय. | ... ... ... ... | ३८३-४१२ |
| महाराजांचे अनुभव | ... ... ... ... | ५३१-५३८ |
| श्री साईसच्चरित | ... ... ... ... | ७११-७२६ |


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआॅर्डरीनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-


## श्री साईसच्चरित.

या श्री साईलीला मासिकांत प्रसिद्ध होत असलेला हेमाडपंत विरचित श्री साईसच्चरित नामक ओवीबद्ध ग्रंथ आतां संपत आला असून लवकरच तो पुस्तकरूपानें बांधवून श्री साई ला ऑफिसांत विक्रीस ठेवण्यांत येणार आहे. या सबंध ग्रंथाचीं पृष्ठें अज..सें ८०० वर होतील व यांत आरंभापासून अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेले व होणारे सर्व फोटो व देखावे हेही प्रसिद्ध होतील. ग्रथा `किंमत ३ रु. ठेविली जाईल. सोवत छापील कार्ड आहे त्यावर सही होऊन परत येतांच तो पाठविणाराचें नांव व पत्ता श्री साईलीला ऑफीसांत नोंदला जाईल. आज फक्त ग्राहक होऊं इच्छिणारांनीं या पत्त्यावर आपलीं नांवें व पत्ते नोंदवावेत. पुरेसे ग्राहक होतांच पुस्तकें बांधवून व्ही. पी. नें रवाना केलीं जातील.


**गोविंद रघुनाथ दाभोळकर,**

५ सेंट मार्टिन्स रोड ( मुंबईनजीक ) बांद्रें.


ता. क. पुस्तकविक्रीचें होणारें उत्पन्न श्री शिर्डी कायम-फंडांत जमा होईल.



श्रीचा शामसुंदर नांवाचा घोडा.

# श्री साईलीलेचें धोरण

## श्री सद्गुरुसाइराजायनमः

सा. न. वि. वि. खालील मजकुरास व विनंतीस आपल्या त्रिभुवमान्य श्री साइलीलेच्या एखादे अंकीं कृपेनें जागा मिळावी अशी सविनय प्रार्थना आहे.

## शार्दूल विक्रीडित.

ज्या आदी, नच, मध्य, अंत, परि जों ब्रम्हांड भांडोदरा।
व्यापूनी न दिसे, पयीं घृत जसें, इक्षूरसीं शर्करा।
ओढी मायिक विश्वसूत्र लपुनी, विश्वासि जो आसरा।
साष्टांग प्रणती तया नटवरा श्री साइ विश्वंभरा।

---

## " भिन्नरुचिर्हि लोकः "

श्री साईलीलेंत कोणते विषय यावेत, कोणते येऊं नयेत, तिचें अंत-र्बहिरंग कसें असावें, तिच्यांत सर्वच गद्य असावें अथवा थोडें गद्य व थोडें पद्य असावें, व तें कोणत्या स्वरूपाचें असावें याबद्दल थोडी प्रत्यक्ष व थोडी अप्रत्यक्ष चर्चा ऐकूं आल्यावरून प्रिय वाचकांपुढें मी दोन शब्द ठेवीत आहे. त्याचा श्री साईभक्त, श्री साईलीलाभक्त, श्री साईलीला वर्गणीदार व वाचक यांनीं सहृदय अंतःकरणानें विचार करावा अशी माझी त्यांस नम्र विनंती आहे.

वरतीं अवतरणांत दिल्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीची आवड निराळी आहे. प्रत्येकाच्या आवडीप्रमाणें प्रत्येक गोष्ट होणें शक्य नसतें. कार्य-प्रयोजनांत निरनिराळ्या आवडीचे व निरनिराळ्या स्वभावाचे स्त्री-पुरुष व मुलेंवाळें भोजनास येतात. त्या ठिकाणीं प्रत्येकाच्या रुचिवैचित्र्याप्रमाणें व

स्वभाववैचित्र्याप्रमाणें पदार्थ निर्माण करणें अशक्य असतें. म्हणून नानाप्रकारचे व भिन्नभिन्न रुचि देणारे पदार्थ तयार करतात. मग ज्यास जशी आवड असेल त्याप्रमाणें तो त्यांपैकीं सर्व अथवा कांहीं पदार्थ कम जास्त प्रमाणानें पण तृप्ती होईपर्यंत खातो. त्याचप्रमाणें श्री साईलीलेचे वाचकही भिन्नरुचीचे असणार. कोणास नुसतेंच गद्य आवडेल तर कोणास नुसतें पद्य आवडेल. कोणास दोन्हीही आवडतील. कोणास मराठी भाषाच आवडेल तर कोणास संस्कृतच आवडेल, कोणास इंग्रजी आवडेल तर कोणास गुजराथी आवडेल; कोणास एकच भाषा येत असेल तर कोणास दोन, कोणास तीन व कोणास चारही भाषा अवगत असतील. व ज्याप्रमाणें एकाच गव्हाचे पदार्थ पण निरनिराळे कुशल वल्लव, अथवा निरनिराळ्या चतुर स्त्रिया निरनिराळ्या तऱ्हेनें ते तयार करतात व त्यांचा भिन्न भिन्न आस्वाद भोजनप्रेमी व तृप्तीच्छु जनांना उपभोगण्यास मिळतो; त्याच प्रमाणें श्री साईलीलेंतही गद्य व पद्य हीं दोन्ही व तीं वर लिहिलेल्या चारी भाषेंत असावीं व त्या प्रमाणेंच एखादा दुसरा अपवादात्मक अंक खेरीज करून आजपर्यंत श्री साईलीलेचें धोरण राखलें गेलें आहे.

आतां श्री साईलीलेंत अनुभवा खेरीज दुसरे कांहीं विषय येऊं नयेत असेंही कित्येकांना वाटतें. व तें तसें वाटणेंही साहजिकच आहे. कारण या मासिकाचें नांवच श्री साईलीला असें आहे. पण त्यावेळीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं श्री शिर्डीसंस्थान व बाबा यांच्या संबंधानें अनुभवाव्यतिरिक्त इतर गोष्टी व माहिती श्री शिर्डी संस्थानहितेच्छु साईभक्तांस कळण्यास ह्या मासिकावांचून अन्य साधन काय आहे? माझ्यामतें श्रीसाईलीलेंत बाबा व शिर्डी संस्थान या व्यतिरिक्त कांहीं विषय येऊं नयेत; परंतु अनुभवावांचून इतर तत्संबंधीं कोणताही विषय येऊं नये, असें म्हणून कसें चालेल? संस्थान व बाबा यांच्या संबंधांचे सर्व विषय त्यांत आले पाहिजेत व त्यांची चर्चा व ऊहापोहही झाला पाहिजे. वस्तुस्थिति पाहतां हल्लींही त्याप्र-

माणें होत आहे. शिर्डी संस्थानची व्यवस्था, नगर कोर्टाचा तत्संबंधी ठराव, ट्रस्टी कमेटीचे सभासद, त्रैवार्षिक सभासदांच्या, निवडणुकी संस्थान व्यवस्थे-संबंधाचे वार्षिक रिपोर्ट, उत्साहांची हकीकत व जमाखर्च, संस्थानचे जमाखर्च, बाबांचीं स्तुतिस्तोत्रें तत्संबंधीं कुटकें, श्लेष वगैरे गोष्टी "लीला" म्हणून कोणी समजणार नाहीं. तथापि ही सर्व माहिती संस्थान व बाबांसंबंधी असल्यामुळें व ती श्रीसाईलीला व इतर वाचकवर्गास समजणें अत्यंत जरूरीचें असल्यामुळें ती व तशीच प्रकारची पण तत्संबंधी दुसरीही महत्वाची हकीकत किंवा माहिती किंवा योजना श्री साईलीलेंत येणें अत्यंत अगत्याचें आहे.

मासिकांस अथवा वृत्तपत्रांस जीं नावें असतात त्याच नांवांस अनु-सरून तो एकच विषय त्यांत येतो असें नाहीं. त्याचा अर्थ असा कीं तन्नाम-दर्शकविषय त्यांत प्रामुख्यानें असतो व तदनुषंगिक इतरही सर्व विषय त्यांत असतात, नसतात असें नाहीं. एखादे घरीं जेवणावळ असल्यास व आज जेवणावळ अथवा प्रयोजन कशाचें आहे म्हणून कोणासही विचारल्यास "आज बुंदीची अथवा श्रीखंडाची अथवा जिलबीची" जेवणावळ आहे असें सांगण्यांत येतें. म्हणजे जेवणांत अथवा प्रयोजनांत जी वस्तु अथवा जें पक्वान्न मुख्य असतें त्याचें नांव जेवणावळीस अथवा प्रयोजनास मिळतें. म्हणजे त्यांत जेवण्याचे इतर जिन्नस नसतात असें नाहीं. व ते तसे नसतील व नुसतें पक्वान्नच असेल तर त्या पक्वानाची मिठी बसून तें खावणार नाहीं, पचणारही नाहीं, तशीच हुबेहुब स्थिति मासिकांची व वृत्तपत्रांची असते. त्यांतही मुख्य विषयाशिवाय तदनुषंगिक इतर विषय थोडयाबहुत प्रमाणानें यावे लागतात. श्रीसाईलीलेंतही अनुभवाखेरीज, नेहमींच नव्हे पण कधीं कधीं, उपरिनिर्दिष्ट केलेले संस्थानसंबंधी व बाबांसंबंधीं विषय जसे येतात तसेच "बाबांचें स्मारक, निरंतरचे खर्चास लागणाऱ्या द्रव्यनिधि समुच्चय सूचना, बाबांच्या चरित्रलेखनां करितां लागणारी निरनिराळ्या प्रकारची माहिती वगैरे वगैरे" यां सारखे विषयही यावयास पाहिजेत.

आतां हें मासिक आहे हेंही विसरून चालणार नाहीं. मासिक या नात्यानें त्यांत "पुस्तकावरील अभिप्राय, संपादकीय सूचना, बाबांच्या कायम-निधि उपाययोजना व तत्संबंधीं जरूर त्या जाहिराती" यावयास पाहिजेत. या सर्वांचा वर दिलेल्या संस्थानसंबंधीं माहितीचा व कार्यक्रमाचा समावेश खात्रीनेंच "अनुभव अथवा लीला" यांत होणार नाहीं. तथापि वरील सर्व गोष्टी अत्यावश्यक आहेत. मग त्या श्रीसाईलीलेंत आल्या नाहींत तर कोठें येणार? मला वाटतें हल्लीं चालू असलेलेंच श्री साईलीलेचें धोरण बहु-जनसमाजास मान्य होण्यासारखें आहे. कित्येक मंडळी अपवाद म्हणून असतील. पण त्यास इलाज काय? त्या श्रीसद्गुरुरायांच्या इच्छेनेंच श्रीसाईलीला चालत आहे व त्यांत काय यावें याची स्फूर्ती तेच लेखकभक्तांस देत आहेत. तरी अशाच रीतीनें हें मासिक सर्वांगसुंदर होण्यास आणखी कोणा सद्भक्तांस योग्य त्या सूचना करणें असल्यास त्यांनीं कराव्या, व मासिकाचें अस्तित्व कायम राखून त्यास चिरायू करावें अशी सर्व साईभक्तांस व ज्यांच्या केवळ नामोच्चा-रानें "मुक्ति" ही मनुष्याची दासी बनते त्या श्री ब्रह्मांडनायक सद्गुरु साईरा-जास अंतःकरणपूर्वक सविनय प्रार्थना करून त्यांच्याच प्रेरणेनें व कृपेनें सुचलेले विचार व केलेलीं दोन वाक्सुमनें मथळ्यावरील शार्दूलविक्रीडित व शेव-टचें उपजाति, त्याच प्रभुपादपुंडरिकावर अनन्यभावें अर्पण करून आपली रजा घेतों.

## उपजाति वृत्तम्.

किमत्र चित्रं यदि "साइ" मंत्रम् ।
जपेत् सदा यः परमं पवित्रम् ।
तद्दासिका मुक्तिरहो विचित्रम्
एवं हि तद्दत्तगुरो श्चरित्रम्॥

अर्थः—परम पवित्र असा जो " साइ " नामरूपी मंत्र तो जो मानव सदासर्वकाळ जपत राहील त्याची " मुक्ति " ही दासीच आहे, यांत आश्चर्य कसलें ! कारण, अहो त्या दत्तगुरूचें चरित्रच असें कांहीं विलक्षण आहे.

ठाणें.
९-९-२६ बावांचें बाळ.

## शिर्डी संस्थान कायमानिधि समुच्चय योजना

### श्रीसाई दत्तगुरुवे नमः

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफल हेतुर्भू र्मातिसंगोस्त्वकर्मणि ॥

श्री. भगवद्गीता श्लो. ४७ अ. २.

बावांच्या स्मारका संबंधानें फार दिवस मनांत घोळत असलेले विचार प्रिय वाचकां पुढें मांडण्याकरितां आपलेकडे पूर्वींच पाठविले आहेत. ते आपल्या सवडी प्रमाणें आपल्या श्री साईलीलेच्या एखादे अंकीं आपण वाचक पुढें ठेवालच. त्यांत अशक्य असें कांहींच नाहीं. माझ्या रूपरेषेप्रमाणें स्मारकास लागणाऱ्या पैशापेक्षां कल्पनातीत पैशाचीं कामें जगांत लाखों ठिकाणां होत आहेत. मी रेखाटलेल्या स्मारक चित्रांतील सर्वच कार्यें एकसमयावच्छेदें-करून केव्हांही होणार नाहींत व त्यांस लागणारा द्रव्यनिधिही एकदम जमा होणार नाहीं. पण "जलबिंदु निपातेन क्रमशः पूर्यते घटः " यी न्यायानें तो गोळा केला पाहिजे. व हें कार्य सर्व साईभक्तांनीं मनावर घेतलें पाहिजे. प्रयत्न करण्याचें काम आपलें आहे, तें सिद्धीस जाईल किंवा

नाहीं हें पाहाण्याचें किंवा एवढें अवाढव्य काम आपल्या हातून कसें होणार असल्या निराशेच्या मनोराज्यांत स्वस्थ बसण्याचेंही काम आपलें नाहीं. काम करण्यापुरताच अधिकार आपला आहे. म्हणून आपण नाउमेद न होतां नेटानें व निश्चयानें बाबांचें नांव घेऊन काम करीत राहावें. सिद्धीस नेणार श्रीमंतांचे श्रीमंत, सार्वभौमाचे सार्वभौम व कुबेराचेही कुबेर श्री सद्गुरुराज समर्थ आहेत. प्रसिद्ध श्री क्षेत्र काशी येथील हिंदु विश्वविद्यालय किंवा पुण्याजवळील हिंगणें येथील स्त्री-विश्वविद्यालय, त्याच प्रमाणें नगर-रचना व सुधारणे ( टाउन प्लानिंग ) च्या कायद्याप्रमाणें मुंबापुरींत व मुंबा-पुरीचे आसपास तसेंच पुण्यपत्तनांत व त्याचे आसपास ज्या मोठ्या भव्य, दिव्य व गगनचुंबित इमारती, विस्तीर्ण रस्ते, विशाल जागा, उद्यानें, आराम-स्थलें, व्यायाम शाळा वगैरे ज्यांनीं पाहिल्या असतील, त्यांना माझ्या बाबांच्या स्मारक कल्पनेची असंभवनीयता अगर अशक्यता केव्हांच वाटणार नाहीं. मात्र त्या योजनेस विपुल द्रव्य व विपुल काल लागणार आहे, हें मलाही कबूल आहे. पण प्रयत्नाअंतीं जर परमेश्वर पावतो तर ही योजना तरी अशक्य कां ?

हें सर्वांस विदितच असेल कीं महाराजांच्या नित्य दिनचर्येच्या खर्चास लागणाऱ्या द्रव्यनिधी करितां प्रथमतः एक लक्ष रुपये जमवावे, असें ठरलें आहे. एक लक्षाचा कायमनिधि जमल्यावर त्याचें व्याज दरमहा ६०० किंवा कमीत कमी ५०० रुपये तरी येईल व इतक्या रकमेंत हल्लीं शिर्डींत संस्थानकडून होत असलेल्या व्यवस्थेपेक्षां खात्रीनें जास्त उत्तम मोठ्या प्रमा-णावर कायमची व्यवस्था कोणासही करतां येईल.

या कार्यासाठीं आतांपर्यंत अजमासें १८००० ते २०००० पर्यंत रुपये जमले आहेत. ८०००० किंवा ८२००० रु. अद्याप जमविणें आहे व त्याकरितां माझ्या अल्प मतीस जे कांहीं मार्ग सुचत आहेत ते मी नम्रपणें प्रियभक्तांपुढें व प्रिय वाचकांपुढें ठेवीत आहें. त्याचा त्यांनीं सहृ-

दयतेनें विचार करावा व पसंत वाटल्यास त्यांस जे मार्ग आवडत असतील किंवा शक्य वाटत असतील त्यांनीं तो किंवा ते मार्ग लागलीच आचरण्यांत आणण्यास सुरवात करावी.

१. आजपर्यंत श्रीयुत कै. रा. रा. काकासाहेब दीक्षित प्रभृति शिर्डी संस्थानचालक व व्यवस्थापकांकडून झालेल्या व होत असलेल्या मनःपूर्वक मेहनतीमुळें या कायमनिधि करतां जवळ जवळ ३५००० किंवा ४०००० रुपयांपर्यंतचे आंकडे पडले आहेत. त्या पैकीं ज्या सद्भक्तांकडून अथवा सद्गृहस्थांकडून अद्याप कांहीं वसूल आला नाहीं त्यांनीं अत्यंत कृपेनें त्या रकमा एकदम किंवा हप्त्याहप्त्यानें होतां होईल तितक्या काळजीनें व निश्चयानें जितक्या लवकर देतां येतील तितक्या लवकर देण्याची तजवीज करावी.

२. बाबांच्या ज्ञात व अज्ञात अशा दोन्ही भक्तांची संख्या अगणित आहे. त्या पैकीं उत्कंठा, उमेद व सामर्थ्य असणाऱ्या १०० भक्तांनीं प्रत्येकीं एक हजार १००० रुपये स्वतः आपण अथवा हस्तें परहस्तें आपल्या सोयऱ्याधायऱ्यांकडून अगर इष्टमित्रांकडून, तसेंच धनिक, सावकार, व्यापारी, नौकर, शेतकीवाले, इनामदार, जहागिरदार, राजेरजवाडे यांजकडून एक किंवा दोन वर्षांचे आंत मिळवून देण्याची तजवीज करावी. असंख्य साईभक्तांत वर सांगितल्या प्रकारचे १०० भक्त निघणार नाहींत असें मला तरी वाटत नाहीं.

३ प्रत्येक श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारानें श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी खेरीज करून शिवाय एक वर्षपर्यंत दरमहा १ रुपया या फंडा करतां द्यावा. यायोगें एक वर्षांत सहज कोणावरही विशेष बोजा न पडतां सुमारें ७ पासून ८ हजारापर्यंत निधि जमेल.

४. ज्याच्या त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या माना प्रमाणें जसा व्यापारीवर्ग आणि नोकरवर्ग आपल्या प्राप्तीवर रुपयास ३, ६, ९, १२, २४ पै

प्राप्तीवरील कर म्हणून सरकारास भरतो, किंवा शेतकरीवर्ग आपल्या वार्षिक प्राप्तीवर रुपयास १ किंवा २ आणे लोकलफंड सरकारास भरतो किंवा कित्येक व्यापारी संस्था आपल्या वार्षिक उत्पन्नावर रुपयास १ पै अथवा जास्त पै या प्रमाणें धर्मादाय म्हणून निराळी रकम काढून ठेवतात, त्याच प्रमाणें प्रत्येक साईभक्तानें आपल्या नैतिक, मासिक व वार्षिक उत्पन्नांतून रुपयास १ अथवा इच्छा असेल तितक्या पै काढून ठेवून ते पैसे दरसाल कायमनिधीस देत जावे.

५. श्रीसाईभक्तांनीं व श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं प्रत्येकीं त्यांचे घरीं प्रत्येक सणाकरतां, व्रताकरतां, नेमाकरतां, दानाकरतां, उद्यापना करतां, वाढदिवसा करतां, जयंती, उत्साह, कुलधर्म, कुलाचार, पर्वणी, श्राद्धपक्ष, मुंज, सोडमुंज, विवाह, गर्भाधान, चौल,श्रावणी, कोजागरी, विद्यारंभ, यात्रा, यज्ञ-याग, नवस, कथापुराण, परीक्षा पास होणें, नोकरी लागणें, लाटरींत बक्षिस मिळणें स्कालरशिप मिळणें, वगैरे बाबतींत अनुक्रमें जो खर्च होत असेल किंवा त्यास जी जी अधिक प्राप्ती होत असेल त्या मानानें त्यानें या निधी करितां कांहीं तरीं शक्त्यनुसार रक्कम काढून ठेवावी व खजीनदार यांजकडे पाठवावी. या रकमा दिसण्यांत जरी ल्हान दिसल्या तरी प्रत्येक साईभक्तानें मनावर घेतल्यास यापासूनही प्रत्येक वर्षी कायमनिधीस बरीच मोठी मदत झाल्यावांचून राहाणार नाहीं.

६. वर लिहिल्या पैकीं एक किंवा अनेक मार्गांचें अवलंबन करून कायमनिधि उभारण्याची सेवा जर साईभक्तांकडून घडली तर प्रत्येक साई-भक्त बाबांचा सदैव ऋणीच आहे. म्हणून वर सुचविलेल्या मार्गाशिवाय आणखी ज्यांस जे मार्ग सुचतील व ज्यांस जे आवडतील त्यांनीं त्या त्या मार्गांचे अवलंबन करून बाबांचा कायमनिधि जमविण्याची व वृद्धिंगत करण्याची खटपट सदैव करीतच राहावें.

तूर्त वर प्रमाणें माझ्या नम्रपणाच्या सूचना आहेत. बाबांचे भक्त प्रत्येकीं आपले घरीं बाबांची सेवा आपापल्या इच्छेनुरूप व द्रव्यानुकूलतेनुरूप नित्य व नैमित्तिक अशी कांहीं तरी करतातच. तथापि बाबांनीं ज्या ठिकाणीं पुष्कळ दिवस निवास केला व जेथें शेवटीं आपल्या मानवी तनूचें विसर्जन केलें त्या पुण्यभूमी मशीद मंदीर व समाधिमातेची व तत्संबंधीं तेथें असणाऱ्या सर्व वस्तूंची निरंतर सेवा करण्याची ही जबाबदारी त्यांचे वरच आहे असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें. ती कां असते याबद्दल बाबांच्या चरित्रलेखनास लागणाऱ्या सामग्री पैकीं मी पूर्वी श्रीसाईलीलेच्या ३ रे वर्षाच्या ९ वे अंकांत ज्या एकंदर ७७ सूचना केल्या आहेत त्यांतील २९८ पानावरील ६५ वी "बाबा व बाबांची समाधि" या मथळ्या खालीं केलेल्या सूचनेवर मी पुढें स्वतंत्र व विस्तृतरीतीनें यथावकाश लिहिणार आहें. त्यांत या जबाबदारी बद्दलचा खुलासा होईलच.

एक लक्ष निधीची व्यवस्था वर लिहिलेल्या अथवा अन्य योग्य मार्गांनीं झाल्यावर त्याप्रमाणें पुढें मंदिरांत होणाऱ्या व आतांपर्यंत जमलेल्या रकमेतून हल्लीं मंदिरांत होत असलेल्या व्यवस्थेंत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत व सूर्यास्तापासून पुन्हा सूर्योदयापर्यंत नित्यशः इतर नैमित्तिक प्रसंगीं ज्या ज्या वस्तूंचा व गोष्टींचा बाबांचे चरणीं उपयोग होईल त्या प्रत्येक वस्तूंत व प्रत्येक गोष्टींत प्रत्येक वर्गणीदार अथवा अन्य प्रकारें पैसे भरलेल्या अथवा भरणाऱ्या भक्ताच्या सेवेचा अंश असणारच. म्हणजे पहाटेच्या काकड आर्तीच्या दिव्याच्या घृतांत त्याचा घृतांश, कर्पूरांत कर्पूरांश, धूपांत धूपांश, नैवेद्याचे शर्करेंत शर्करांश असणारच. त्याच प्रमाणें सकाळचे पूजाद्रव्यांत, गंधांत गंधांश, अक्षतांत अक्षतांश, पुष्पांत पुष्पांश, तैलदीपांत तैलांश, भातांत भाताचा कणांश, वरणांत डाळीचे दाण्याचा कणांश, तुपांत तुपाचे कणीचा, भाजींत भाजीचे फोडीचा, भाकरींत पोळींत पक्वान्नांत अत्यल्प शतांश, सहस्रांश लक्षांश त्याच प्रमाणें ताकांत, दुधांत, कढींत एक बिंदू अथवा बिंदूचा सह-

स्रांश अथवा कोटयंश, कांहीं कां असेना पण कांहीं तरी अंश हा असणारच. समाधी पुढें वाजणाऱ्या सनईत त्याचा एक सूर किंवा सुराचा अत्यल्पांश, चौघड्यावरील टिपऱ्यांत त्याचे एक अथवा अत्यल्पांश टिपरु तरी असणारच. पहाटे, सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं व रात्रीं समाधिपुढें होणाऱ्या पुराणांत व कथेंत व निरनिराळ्या भक्तांनीं म्हटल्या जाणाऱ्या भूपाळ्या, आरत्या, पदें, श्लोक, स्तुतिस्तोत्रें, शेजारत्या, भजन यांत त्याचें एक अक्षर तरी असणारच. सारांश मूळ ठिकाणीं ईशचरणीं त्याची नित्यशः व इतर नैमित्तिक प्रसंगीं त्याची इतकी सेवा घडणारच. अशा प्रकारची घरीं व मूळ ठिकाणीं अंतर्बाह्य सद्गुरुसेवा खरोखरच पूर्वजन्मीचें कांहीं तरी महद्भाग्य असल्यावांचून घडणें कठीण. करितां याही गोष्टीचा विचार प्रिय साईभक्त, प्रिय साईलीला वर्गणीदार व प्रिय श्रीसाईलीला वाचक यांनीं अंतःकरण पूर्वक श्रद्धेनें करावा अशी त्यांस नम्र विनंती करून ज्याच्या प्रेरणेनें वरील विचार व योजना मला सुचल्या आहेत त्या व शेवटील रथोद्धता वृत्तांतील वाक्पुष्प त्या श्रीसमर्थ सद्गुरुचरण कुशेशयावर मनोभावें अर्पण करून, आपली रजा घेतों.

### रथोद्धता.

कॉल[1] नेत[3] क्षण[2] नॉ कराल[4] कॉं ।
साइ-दत्त-गुरु-श्री स्मराल कां ।
संसृती जलनिधी तराल कां ।
जन्म सार्थक खरें कराला कां ॥

ठाणें. }
१०-९-२६ } बाबांचें बाळ.

१ काळ यम. २ आयुष्य ३ नेत नाहीं कां ? ४ दुष्ट भयंकर.

# श्री साईभक्तांस विनंती

शिर्डी मुकामीं श्रीचे समाधीवर अगर पादुकांवर अभिषेक अगर लघुरुद्र, महारुद्र कादसण्या वगैरे धर्मकृत्यें करण्यासाठीं अगर फकीरास अथवा ब्राह्मणास भोजन वगैरे घालावयास तसेंच दीपोत्सव, किंवा नंदादीप लावणें वगैरे अनेक रूपानें समर्थाचे पुष्कळ भक्त शिर्डीस लहान मोठ्या रकमा पाठवीत असतात हें ठीकच आहे; परंतु त्या बरोबर शिर्डीच्या "कायम फंडा" कडेही भक्तांनीं लक्ष देणें जरूर आहे. आपण नेहमी ध्वजारोपण, संकष्टी चतुर्थी, शनि, सोम, प्रदोष, गौरीपूजन, मंगळागौरी, रामजयंति, वराहजयंति, वामन जयंती, कृष्ण जयंती, हनुमान जयंती, दत्त जयंती, कालभैरव जयंति, आद्यशंकराचार्य जयंती, नृसिंह जयंती आपापल्या गुरूच्या पुण्यतिथी वैशाखस्नाने शिवरात्री, दशाहरारंभ सावित्री व्रतारंभ, भागवत सप्ताह, व्यासपूजा, दीपपूजा, नागपंचमी, श्रावणी, गोकुळाष्टमी पिठोरी, हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, अनंतचतुर्दशी महालयारंभ, भरणीश्राद्ध, अविधवा नवमी, गजच्छायापर्व, सर्वपित्री अमावास्या, नवरात्रारंभ, घटस्थापन, सरस्वतीपूजन, कोजागरी, लक्ष्मीपूजन, कार्तिकस्नानारंभ, गोक्रीडन, अन्नकूट, वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरपूजा, धनुर्मासारंभ, माघस्नानारंभ, महोदयपर्व, विजयादशमी–दसरा–हुताशनी, वसंतोत्सवारंभ, इत्यादि पैकीं आपण आपले येथें वर्षाचे वर्षास कांहीं ना कांहीं तरी व्रतें, कांहीं तरी पर्वें, कांहीं तरी पूजा व कांहीं तरी स्नानें आणि उत्सव करीत असतोंच, व तत्प्रीत्यर्थ दक्षिणेच्या मिषानें दरसाल आपला सर्वांचा किती तरी खर्च होत असतो. धर्माच्याकामीं हा व्यय इष्टच आहे.

आतां ज्याची पूजा करावयाची तें प्रधान दैवत तर खरेंच; तरी पण या प्रत्येक वेळीं त्याच प्रधान दैवताच्या बरोबरीचें किंबहुना त्याहूनही अधिक दर्ज्याचें आपल्या गुरुदेवतेचें स्मरण व पूजनही होणें आवश्यक आहे. गुरूच्या महत्वाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे.

"गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः गुरुस्साक्षात्परब्रह्म" हें मनांत आणलें म्हणजे प्रत्येक कार्यांत होणाऱ्या द्रव्यव्ययाचा इच्छेस येईल तो

अंश आपलें प्रत्यक्षाचें गुरुदैवत जें श्रीसाईनाथ त्यांच्या प्रीत्यर्थ स्वतंत्रपणें काढला जाईल तर सहजींच श्री साईनाथ संतुष्ट राहून सहज थेंबें थेंबें तळें साचे या नियमानें प्रत्येक साईभक्ताला "श्रीसमर्थांचे कायम फंडास अनायासें मदत केल्याचें श्रेय मिळेल.

अशा तऱ्हेचा उपक्रम आपल्यापैकीं कांहीं सद्भक्तांकडून सुरू होऊन त्यांचेकडून खालील प्रकारच्या रकमा श्रीचें कायमफंडाकडे येण्याची सुरुवात झाली आहे हें त्यांना व त्यांचे कुटुंबांतील लहान थोरांस फार श्रेयस्कर व भूषणावह आहे:—

| | |
|---|---|
| आपले घरची गाई प्रसूत होत असतां तिला प्रदक्षिणा केल्याचें श्रेय संपादनार्थ गोप्रदान दक्षिणा ४ इसमांनीं केल्याबद्दल प्रत्येकीं १। रु. प्रमाणें | रु. ५—०—० |
| एका बाईचे मुलगीचे वाढदिवसाप्रीत्यर्थ दक्षिणा | रु. १—०—० |
| अधिक महिन्याचें वाण २ बायांचें .... | रु. ३—४—० |
| तीन मुलांचा मराठी व इंग्रजी विद्यारंभ ... | रु. ३—०—० |
| भोजन दक्षिणा .... .... | रु. १—०—० |
| गुरुचरित्र सप्ताह दक्षिणा .... .... | रु. ०—५—६ |

सदरील रकमा जरी अल्प आहेत असें सकृद्दर्शनीं दिसतें तरी आपल्या घरच्या प्रत्येक धर्मकृत्यांत इतर आराध्य दैवतावरोबर श्री साईबाबांचेंही ते आदरानें स्मरणपूर्वक पूजन करीत असतात हें त्यांचें कर्तव्य अत्यंत प्रशंसा पात्र आहे व हें फार अनुकरणीय आहे अशी जाणीव आम्हां सर्व साई-भक्तांत उत्पन्न झाली तर या रकमांची आवक बऱ्याच अधिक प्रमाणावर जाईल. तरी या गोड अनुकरणाची आवड सर्व साईभक्तांत उत्पन्न होवो अशी श्री साईसमर्थचरणीं आमची नम्र विनंती आहे.

संपादक

श्रीसाईनाथाय नमः ।

# करुणावली.

( दिगंबर शंकर भगवान. )

नमन तुज असो हे सद्गुरू साइनाथा ।
तुजविण मज त्राता कोणि नाहीं सनाथा ॥
म्हणुनि तव पदाब्जीं प्रार्थितों देव-दत्ता ।
झडकरि मजलागीं पावना पाव आतां ॥ १ ॥

प्रति-दिनिं बहु तापें तापलों देवराया ।
हरुनि दुरित माझें घालवी मोहमाया ॥
अचपल मन माझें नावरे साइनाथा ।
घडि घडि मज होतो शीण रे धांव आतां ॥ २ ॥

भजनरहित देवा जन्मही सर्व जाई ।
स्वजन-जन-धनाचा मोहही जात नाहीं ॥
परम-दिन-दयाळा व्यर्थ तो ताप होतो ।
दुरित दुरि हरोनी हस्त ठेवी शिरीं तो ॥ ३ ॥

अखिल त्यजुनि देवा सर्वभावें भजावें ।
परम-सदय नाथा हीत माझें करावें ॥
षड्-रिपु-मजलागीं गांजिती जंबुकीरे ।
झडकरि झड घालीं सद्गुरू शार्दुलारे ॥ ४ ॥

तुजविण गुरुनाथा चित्त कोठें न राहो ।
हळु हळु मन माझें आपलेंसें करा हो ॥
शरण तव-पदाब्जीं मागितों; देवराया ।
वरद-कर धरींरे मत्शिरीं साइराया ॥ ५ ॥

॥ श्री ॥

॥ पद ॥

रसने रंगेगे सद्‌गुरुनामीं ॥ किति तरि भुलसिल कामीं ॥ धृ०॥
दुर्लभ या नरदेहीं, सार्थक तूं करीं कांहीं ॥
व्यर्थ नको करूं मी, मी, ॥ १ ॥
सोडुनींया गुरुस्मरण, व्यर्थ मोहीं करिसि भ्रमण ॥
अंती तुज नये कोणी कामी ॥ २ ॥
स्थीर करी मनोवृत्ति, जिवा दावी आत्मप्रतिति ॥
चिरसुख देईल सद्‌गुरु स्वामी ॥ ३ ॥
बाळ म्हणे साईनाथ, स्मरे बाई दिन रात ॥
तोचि तुज नेईल निज धामीं ॥ ४ ॥

॥ अभंग ॥

उपेक्षीसी जरी । शरण जाऊं कोणा तरी ॥ १ ॥
केली पाहिजे करुणा । दिन बंधो नारायणा ॥ २ ॥
मज नलगे जीवन्मुक्ती । देईं त्वच्चरणीं आसक्ती ॥ ३ ॥
म्हणे बाळ साईनाथा । लाज राखी माझी आतां ॥ ४ ॥

# श्रीसाईनाथ पद्यावली

सौ. कृष्णाबाईविरचित

## ॥ पद ॥

( चाल–परी शिवा न लावी )

साइनाथ दयाघन अवतरला ॥ शिर्डीसी प्रभुदत्त आला ॥ अवधूत आला॥धृ॥ शिष्यमेघा शंख पुकारी ॥ तास झणाणं जय घोष करी ॥ स्वारी निघाली चावडीवरी ॥ जाते आरतीला ॥ आई, राधा कृष्णाबाई दर्शनाला ॥ १ ॥ छत्र धरीती वरी चवरी ढाळिती ॥ भालदार साईनाम पुकारिती ॥ स्वानंदें साई मान डोलविती॥ देहभाव सरला ॥ साईनाथ पदींलीन होऊं चला ॥ २ ॥ पहाट झाली काकड आरती ॥ वाजे नगारा जय जय करीती ॥ साईनाथ प्रभु कुशीवर वळती ॥ पहा स्वरूपाला ॥ तमरूप:अंधकार दवडाला ॥ ३ ॥

## ॥ पद ॥

( नका वारीस जाऊं दीन )

कधीं पाहीन साईस्वरूप मी नयन भरोनी ॥
कधीं होईल तल्लीन साईपदास बघोनी ॥
॥ चाल ॥ गूण गाई आवडीनें, साई चरण ॥
सेवीन वंदीन हर्षभरें मी ॥ १ ॥

## ॥ पद ॥

( चाल–राम स्मरावा )

साईचा मनीं ध्यास निरंतर ॥ धृ० ॥
त्रैलोकीं साई व्यापूनी उरला । शिर्डीसी करी वास ॥१॥
नामामृत तव गोड किती रे । भागत नच मम प्यास ॥२॥

कर जोडुनि मी लीन तव पदीं । पुरवी मनींची आस ॥३॥
नामस्मरणें पातक पर्वत । क्षणांत जळतिल खास ॥ ४ ॥
तव पद भक्ती मागतसें मी ॥ पुरवि मनींची आस ॥५॥

॥ पद ॥

( चाल—भूपती खरे ते वैभव )

हे दिनदयाळा, साईनाथ अवधूता ॥
झडकरी धांवरे पाव श्रीगुरुनाथा ॥
या कलीयुगामधें नाहिं तुम्हाविण त्राता ॥
जगीं तुम्हींच आम्हां तातबंधु अणि माता ॥
॥ चाल ॥ तूं अससि प्रभू जगपाला, साइरे ॥
आम्हीं हीन दीन तव पायीं, पाहिरे ॥
करिं कृपा अम्हांवरी साई, तारिरे ॥
तूं जगदोद्धारक अससी श्रीगुरुनाथा ॥
आम्ही हीन दीन तव ठेवितसों पदीं माथां ॥

॥ पद ॥

( नृप ममता रामावरती या चालीवर )

साइ नाम गोड किती होई ॥ मन्मना बहुत सुख देई, सर्वदा ॥
यांतची तरंगत राही । मी सदा सुखाला पाही । खचितची ॥ धृ० ॥
आसनीं भोजनीं शयनीं । साइरूप येतसे ध्यानीं । सर्वदा ॥ २ ॥
॥चाल॥ साइनाथा, ठेविते पदीं माथां मागतें सदा । वसे मम हृदयीं
वसे मम हृदयीं । मागणें दुजें नच कांहीं । याहुनी ॥ ३ ॥ साई० ॥

॥ आरती ॥

आरती साईराया । ब्रह्माविष्णू महेश्वरा ॥
कली माजी अवतार । जगद्गुरू विश्वंभर ॥ आ० ॥

निर्गुण निर्विकार । नकळे वेदासीपार ॥
सगुण ब्रह्मसाजिरें हो । कळा अनंत अपार ॥
सच्चिदानंद मूर्ती । अंतरसाक्षी हा ईश्वर ॥ आ० ॥१॥

देखूनी दीनजन । कृपाओळे दयाघन ॥
दैन्य दुःख निवारून । करी त्यांचें समाधान ॥
अनाथनाथ दीनबंधू । ऐसा पतितपावन ॥ आ० ॥ २ ॥

स्थापोनी सकळ धर्म । चारीवर्ण ते आश्रम ॥
आज्ञेनें वर्तवूनीं । पूर्ण करी त्यांचे काम ॥
निवारूनी दुष्ट बुद्धी । भक्तीलावी परम ॥ आ० ॥ ३ ॥

देशोदेशीच्या यात्रा येती । जे जे इच्छा ते मागती ॥
तेंचि त्यासी प्राप्त होय । वरदहस्त कृपा मूर्ती ॥
अंगेही वर्तवोनी । दावी दया क्षमा शांती ॥ आ० ॥४॥

भाविक भक्तजन । त्यासी नित्य हो दर्शन ॥
दृष्टांतीं येऊनियां । दावी सर्व ऊण खूण ॥
प्रसाद देऊनियां ॥ होय अदृश्य आपण ॥ आ० ॥५॥

विनंती दास करी । सदा रहावें अंतरीं ॥
इच्छीलें पुरवीसी । अभय असो निर्धारीं ॥
अनन्यशरण आलों । साई आपणा ऐसें करी ॥आ०॥६॥

## ॥ पद ॥

( चाल. बजरंगवलीकी )

सौ. शांताबाई विरचित

गुरूराज साईनाथ मूर्ती मम हृदयीं ठसली ॥
निरंतर ममहृदयीं ठसली ॥ धृ० ॥
विनंती हीच आपुले चरणीं घ्यावें मज पदरीं ॥
गुरूराज घ्यावें मज पदरीं ॥
भवजलधींतुन माझी हे प्रभूजी करणें ती ॥
मुक्तता असें कीं अपुले हातीं हीच असे विनंती ॥गुरू०॥

## ॥ पद ॥

( भूपती खरे ते वैभव या चालीवर )

भूवरी दयाळु साइ दयाघन साचा ॥
अवतार असे हा कबीर प्रभु श्रीगुरुचा ॥
गोदावरी तटीं शिर्डीसीं हा आला ॥
झडकरी चला हो नमुंया साइपदाला ॥
म्हणुनी तूं त्यासी वंदावें, मानवा ॥
गुण त्यांचे निशिदिनीं गावे, मानवा ॥
साईचरणा नित्य स्मरावें, मानवा ॥
या कलीयुगामध्यें भवसिंधू उतराया ॥
श्री साईवीण नच मार्ग तुम्हांला, बरवा ॥ १ ॥

## श्रीसाईनाथ संस्थान शिर्डी येथील शके १८४८ च्या गोकुळ अष्टमीच्या उत्सवास आलेली वर्गणी वगैरे झालेला खर्च.

जमा

२३०॥~। मनीऑर्डरनें, रोखीनें, व धान्य, गूळ वगैरे रूपानें आलेली वर्गणी.

१। रा. रा. सावळाराम आत्माराम शिरोडकर, कुर्ला.

१० ,, रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर

१ ,, पापासो राजण्णा मुंबई

५ ,, नागेश आत्माराम सावंत

५ ,, जी. एच्. कोठवळे

२ ,, यशवंत जनार्दन गाळवणकर वांद्रें.

२ ,, जनार्दन रामचंद्र दळवी पेण.

५ ,, पुरुषोत्तम गजानन अँड कं.

२ ,, दिनकर बाबुराव उदगांवकर.

५ ,, बाबाजी कान्हुजी चव्हाण

१ ,, बाबाजी आनंदराव मोहीले.

९ ,, त्र्यंबक आनंदराव कर्णीक कल्याण मार्फतीनें.

५ स्वतःचे

१ रा.रा. गोविंद लक्ष्मण फणसे.

२ ,, द्वारकानाथ मुकुंद दुर्वे.

१ ,, शंकर अनंत प्रधान.

९

२ रा.रा.रावजी बाळकृष्ण उपासनी

१ ,, यशवंत राजाराम जुन्नरकर

१ ,, व्ही. के. पाटणकर.

नांवें

३।॥ आमंत्रणकार्डें पाठविण्याबद्दल टपालखर्च.

३८॥।-। कोपरगांव येथून सामान खरेदी

४ घासलेट डबा खर्च सुर्दा.

५० गहूंरूपानें आलेली वर्गणी गहूं खर्च झाले सबब नांवें.

४१७८ गूळ रूपानें आलेली वर्गणी गूळ खर्च झाला सबब नांवें.

१ रा. रा. व्ही. के. पाटणकर यांचे कुंपणांत लिहिले प्रो दक्षिणा पेटींत टाकली सबब नांवें.

४। सर्पण मण ८१५ उक्ते रुपये.

८।~ संस्थानचे सामान खर्च पडलेल्या बिलाची रक्कम.

७ धर्मार्थ रक्कम दिली.

-।॥- गाडीभाडें श्रीमारुतीबुवाकरितां.

१॥~ दुधाबद्दल किरकोळ खर्च.

-॥- रोजदारणी बत्यांस

११॥।~ तुप शेर ८५। दर २। रु. प्रो.

१६ गहूं खरेदी मण ८१ दर १६ प्रो.

१८॥।- गुळ खरेदी शेर ८९० दर रु. २६ प्रो.

९ तांदूळ रूपानें खर्च पडलेली रक्कम

१॥ प्रसाद पाठविण्यास टिकीटें.

१। मिर्च्या शेर ८२

८ तावदस्ता १

८ विण्यास तार.

| जमा | | नावे |
|---|---|---|
| २ | ,, सदाशिव आप्पाजी मुणगेकर | २८= तेल शेर ८३। दर -॥=॥ प्रों. |
| ५ | श्री. उमाबाई कृ. ठाकूर. | ॥= प्रसादाच्या पिशव्यांस. |
| ५ | एका दत्तभक्ताकडून. | २२२॥।-। |
| ३०॥=। | श्री अण्णासाहेब दाभोळकर यांचे मार्फत आलेली वर्गणी. | १७८८॥- शिल्लक |
| ७ | मागील शिल्लक. | २३९॥।-॥।- |
| ३ | श्री. सुलोचनाबाई वांकडे. | |
| २ | रा. रा. एन. जी. वागळे. | |
| २ | ,, गोविंद रघुनाथ दाभोळकर | |
| ५ | ,, कृष्णाजी नारायण मालपेकर. | |
| ५ | सौ. यमुनाबाई सखाराम सामंत. | |
| १। | श्री. पार्वतीबाई गव्हाणकर. | |
| ३ | रा. रा. लक्ष्मण गोविंद मुंगी. | |
| १। | ,, शामराव आर. जयकर. | |
| १८=। | ,, नारायण गोविंद काजळे. | |
| ३०॥=। | रोखीनें आलेली वर्गणी. | |
| १० | ,, बापू राघु वोरावके. | |
| ११। | ,, बाळा बापू जगताप मार्गील गव्हाचें वर्गणीबद्दल रोख. | |
| ३ | ,, धनवोटे ओरशिअर. | |
| २ | ,, बाळा काशिराम शिंपी. | |
| ५ | ,, मुल्तान फत्तेचंद मारवाडी | |
| २ | ,, गबाजी नंवले संगमनेर. | |
| १। | ,, दाजी वामन चितांवर, धान्य व गूळ रूपानें आलेली वर्गणी. | |
| १२॥ | ,, तात्या पाटील कोते. गूळ शेर ८६० दर २५ प्रमाणें | |
| १२॥ | ,, रामचंद्र दादा पाटील कोते गूळ शेर ८६० दर २५ प्रमाणें | |

जमा

१२॥ ,, बाबुराव सखाराम गोंदकर
७ गहूं पायली८८८ दर१४ प्रों
५॥ गुळ भेली शेर ८२७॥ दर
२५ प्रमाणें

१२॥

२४ रा. रा. पुनमचंद्र भागचंद मार-
वाडी. गहूं मण ८१॥ दर
१६ रु. प्रमाणें.

५। ,, दाजी रामजी शेलके गहूं
पायली८८६ दर१४ प्रमाणें.

८॥ ,, बाळा पुणेकर गहूं पायली
८८१० दर १४ प्रमाणें

४ ,, पुंजा लक्ष्मण धनगर गहूं
पायली ८८४ दर १६ प्रमाणें

१ ,, नामदेव गमाजी पाटील
कोते गहूं पायली ८८१

६ ,, नंदराम शिवराम मारवाडी
गूळ शेर ८३० दर २४ प्रमाणें.

४।≡ ,, बळवंतराव जगताप गूळ
शेर ८२२॥ दर २५ प्रमाणें

९ ,, दामुशेट कासार नगरकर
यांचे तांदूळ पायली ८८६ दर
१॥ रु. प्रमाणें

३२०॥ー

८।≈॥ पेटींतील रक्कम
श्रीवाडा व मशीद, पेटींत
निघालेली रक्कम

ー॥≈ सामानविक्री, कणिक मोकळ
पायली ८८१॥

३३९॥ー॥

श्रीचे चरणकमलीं शतशः दंडवत असोत. विनंति ऐसीजे. या उत्सवाचे प्रसंगीं ज्या ज्या श्री समर्थभक्तांनीं मदत केली, त्यांना व सर्व भक्तांना इह-लोकीं आपले कृपाछत्रानें सौख्य लाभून आपली सेवा सदैव त्यांचे करवीं व्हावी अशी इच्छा आहे. ती पूर्ण होईलच. पण इतर उत्सवांस श्रीसमर्थ भक्तां-पैकीं बरीच मंडळी येते व या उत्सवास ती येत नाहीं तरी त्यांना इकडे येण्याची प्रेरणा श्रीसमर्थांनींच करावी, अशी त्यांजपाशीं प्रार्थना आहे. यंदा श्रीमान् हरि सीताराम दीक्षित उर्फ काकासाहेब यांच्या निधनामुळें या उत्सवास त्यांची जागा भरून काढण्यास कोणी आलें नाहीं, तरी यापुढें ही उणीव भरून निघेल अशी उमेद आहे. कै० हरि सीताराम दीक्षित ऊर्फ काकासाहेब यांच्या आत्म्यास सद्गति मिळो, हीच सदिच्छा आहे, ही सेवेशीं विज्ञती सादर होय.

ता० १६-९-२६ } तात्या गणपत पाटील कोते
रामचंद्र दादा पाटील कोते

# ह. भ. प. कै. रा. रा. हरि सीताराम दीक्षित.



देहावसान-सोमवार ज्येष्ठ वद्य ११, शके १८४८ (ता. ५ जुलै १९२६)

॥ जनीं मरोन उरवावें। कीर्तिरूपें ॥
॥ देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी ॥
॥ मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्तीतें ॥
॥ धन्य धन्य म्हणे लोक । सत्क्रिया करितां बरी ॥

---

काकासाहेबांच्या निधन वार्तेनें हळहळ वाटली नाहीं असा इसम निदान श्री साईभक्तांत तरी सांपडणार नाहीं. इतकेंच नव्हे तर आम्हांला असें वाटतें कीं अखिल महाराष्ट्रांत, मध्यप्रांतांत व इतर ठिकाणींही त्यांच्या मृत्यूमुळें सर्वांस सारखेंच वाईट वाटलें असलें पाहिजे असें त्यांच्या संबंधीं बहुतेक सर्व

मराठी, गुजराथी व इंग्रजी वर्तमान पत्रांतून आलेल्या मृत्यु लेखावरून उघड दिसतें. काकासाहेबांची योग्यताच तशी मोठी होती व त्यांना मृत्यूही त्यांच्या लौकिक योग्यतेला व तप: सामर्थ्याला साजेल अशाच तऱ्हेचा आला. मृत्यु हा केव्हांही शोचनीय खराच; परंतु काकासाहेबांवर यमराजानें आपले पाश ज्या तऱ्हेनें टाकले ते पाहातां, दुःखांत सुख म्हणतात त्याप्रमाणें भवितव्यतेचें कौतुकच वाटतें. अंतकाल समीप येत चालला म्हणजे त्याची पडच्छाया कांहीं काल पूर्वी एकाद्या आजाराच्या किंवा अन्यरूपानें दृग्गोचर होते. परंतु काकासाहेबांच्या बाबतींत तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. मृत्युपूर्वी एक निमिष सुद्धां 'आपला काल आला' अशी जाणीव त्यांना किंवा त्यांचे बरोबर असलेल्या त्यांच्या स्नेह्यांना झाली नाहीं. काकासाहेबांना "हार्टडिसीस" होता असें कांहीं वर्तमानपत्रांत छापिलें आहे. परंतु ती गोष्ट खरी नाहीं हें आम्हांला खात्रीपूर्वक माहिती आहे. काकासाहेबांचें देहावसान एखाद्या योग्याप्रमाणें झालें. फरक इतकाच कीं योगीजन वेळ आली म्हणजे प्राणावरोध करून देह सोडतात आणि काकासाहेबांचें वेळ आल्याबरोबर देहावसान झालें.

खरोखर तात्त्विक दृष्टीनें काकासाहेब अंतकालीं आपल्या चतुर्थाश्रमांतच होते. "चतुर्थाश्रम" म्हणजे त्यांनीं लौकिकदृष्ट्या भगवीं वस्त्रें परिधान केलीं नव्हतीं. तसे ते संसारांत होते. परंतु त्यांनीं सर्वसंन्यास केला होता. भगवीं वस्त्रें नसलीं तरी योग्य कालीं श्री सद्गुरु साई बाबांनीं त्यांना कफनी परिधान करविली होती. स्थूलमानानें त्यांच्या आयुष्याचे चार विभाग केल्यावर प्रथम त्यांची विद्यार्थी दशा, नंतर यथाकालीं गृहस्थाश्रम, श्री साईमहाराजांचे सेवेला लागल्यापासून महाराजानीं समाधी घेई पर्यंत वानप्रस्थाश्रम, व नंतर चतुर्थाश्रम. या त्यांच्या चारी आश्रमां संबंधीं सोपपत्तिक विवेचन आम्हीं पुढें करणार आहोंत.

अंतकालीं ते संसारांत आहेत असें वर वर पाहाणारास वाटत असलें तरी खरोखर ते संसारा पासून अलिप्त राहून ईशभजनांत आपलें शेष आयुष्य कंठीत होते. त्यांच्या संभाषणांत केव्हांही वरचेवर साई महाराजांचें

नांव निघालें नाहीं असें होतच तसे. इतके ते आपल्या सद्गुरुस्वरूपांत तल्लीन झालेले होते. यांचें कुटुंब सौ. सरस्वतीबाई कांहीं वर्षांपूर्वी निवर्तल्या होत्या. वडील मुलगा चि. रामकृष्ण याचें उच्च शिक्षण संपून त्याचें लग्नही झालेलें आहे व लवकरच तो स्वतंत्ररीतीनें आपला संसार करण्याच्या मार्गाला लागेल अशा स्थितींत आहे. धाकटा मुलगा चि. बाळकृष्ण हा अद्याप लहान आहे खरा, परंतु त्याचें संगोपन करण्यास काकासाहेबांचे पाठचे बंधु सदाशिवराव भाऊ ( जे हल्लीं कच्छ संस्थानच्या दिवाणगिरीवर आहेत ) हे आहेतच. आपल्या मेसर्स. दीक्षित माणेकलाल आणि कंपनी नांवाच्या पेढींतून काकासाहेबांनीं आपलें अंग पूर्वींच काढून घेतलें होतें. तरी पण मि. माणेकलाल विषयीं त्यांना इतकी आस्था होती कीं मध्यंतरीं गत वर्षीं मि. माणेकलाल आजारी असतांना काकासाहेबांनीं दररोज ऑफिसांत जाऊन पेढीचें काम आपलेपणानें सांभाळलें होतें. सारांश काकासाहेबांची आयुष्यांतील इतिकर्तव्यता संपली होती व त्यांचें देहावसान अकालीं झालें असें म्हणतां येत नाहीं. आतां एवढी गोष्ट खरी कीं काकासाहेब आणखी थोडीं वर्षें वांचते तर त्यापासून त्यांच्या मुलांना व स्नेह्यानाच नव्हे तर इतरही अनेक दृष्टीनें फायदेशीरच झालें असतें. विशेषेंकरून श्री शिर्डी संस्थानाला त्यांची अद्याप फार जरूरी होती. परंतु अशा तऱ्हेच्या आशेला अंतच नाहीं. एखादा अगदीं वृद्ध कपि आपल्या पणतवंडाचें मुख पाहून आपल्या वयाच्या ९५ व्या वर्षीं वारला तरी ( मात्र त्याच्या आयुष्याबरोबर त्याचें उत्पन्नही अव्याहत चालू असलें पाहिजे ) " तेवढी विनूची मुंज बाबासाहेबांचे देखत झाली असती म्हणजे बरें झालें असतें " असे उद्गार काढून त्यांना आणखी ५ । ७ वर्षें आयुष्य चिंतणारे महात्मे असणारच. हा मनुष्यस्वभाव आहे. हा संसार आहे. त्याला मर्यादा नाहीं. व त्याबद्दल कोणाला दोष देणें वाजवीही नाहीं.

अलीकडे काकासाहेब आपला काळ भजन, पूजन पोथीचें वाचन वगैरे पारमार्थिक विषयाकडेच वेंचीत असत. ते पार्ल्यास आपल्या बंगल्यांत राहात असत. रविवारीं सकाळीं म्हणजे त्यांचे मृत्यूचे आधले दिवशीं नेहमीं

प्रमाणें त्यांचे परमस्नेही रा. रा. अण्णासाहेब दाभोळकर हे पार्ल्यास गेले होते. त्यांचे बरोबर रा. काका तेंडुलकरही होते. शिर्डीचे माधवराव देशपांडे त्या दिवशीं पार्ल्यांस होते. काकासाहेबांचें नित्यनियमाप्रमाणें सकाळीं एकनाथी भागवताचें वाचन झाल्यावर, अण्णासाहेब नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें वांद्र्यांस परत जाणार होते; परंतु त्यावेळीं पाऊस अतिशय पडत असल्यामुळें काकासाहेबांना त्यांना व तेंडुलकरांना पार्ल्यासच भोजनास ठेऊन घेतलें. भोजनोत्तर दोन प्रहरीं काकासाहेबांचा मुंबईस त्यांच्या वडील चिरंजीवांस डॉ. देशमुख यांचे दवाखान्यांत भेटण्यास जाण्याचा विचार होता. त्यांच्या चिरंजिवांना थोडे दिवसां पूर्वी मुंबईस डॉ. गोपाळराव देशमुख एम्. डी. (लंडन) यांचे निरीक्षणाखालीं त्यांचेच दवाखान्यांत ठेविलें होतें. चिरंजीवाला "अॅपेन्डिसाईटीस" (आंतड्याचा एक विशिष्ट रोग) असावा असा डॉक्टरांना संशय होता व रोगाचे निदान ठरल्यावर शस्त्रक्रिया व्हावयाची होती. परंतु त्या दिवशीं पाऊस फार असल्यामुळें ते मुंबईस गेले नाहींत व अण्णासाहेबांनाही त्यांनीं वांद्र्यास घरीं जाऊं दिलें नाहीं. रात्रीं आरती झाल्यावर नित्यक्रमाप्रमाणें काकासाहेबांनीं भावार्थ रामायणाचा एक अध्याय वांचला. योगायोग असा कीं त्या दिवशींचा अध्याय "गजेंद्र मोक्षा"चा होता. (सुंदरकांड, अध्याय २१). अण्णासाहेबांचा रात्रीचा मुक्काम तेथेंच झाला. सोमवारीं पहाटे अण्णासाहेबांना एक महत्वाचें स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांना श्रीसद्गुरु साईबाबांचें दर्शन झालें. श्रीसाईबाबा हे अण्णासाहेबांच्या अंगावरील पांघरुणांत शिरले आहेत व अण्णासाहेबांचे कुशीशीं निजत आहेत व त्यांस अण्णासाहेब अतिप्रेमानें कवटाळून धरीत आहेत असें तें स्वप्न होतें. सकाळीं जागे झाल्यावर हें स्वप्न त्यांनीं मोठ्या कौतुकानें रा. रा. देशपांडे, रावसाहेब लघाटे, व काकासाहेब जागे झाल्यावर काकासाहेबांसही सांगितलें. सर्वांना त्या स्वप्नाचें मोठें कौतुक वाटलें; परंतु त्यावेळीं त्याची अर्थसूचकता कोणाच्याही लक्ष्यांत आली नाहीं. व ती येणार तरी कशी? त्याच दिवशीं दोन प्रहरीं ओढवणाऱ्या प्रसंगाची ती सूचना होती याची त्यावेळीं कोणालाच कल्पना

नाहीं. नित्यनियमाप्रमाणें सकाळीं भागवताचें वाचन झालें. त्यांतील विषयही पुढें येणाऱ्या प्रसंगाचा सूचकच होता असें प्रत्यक्ष तो प्रसंग येऊन पोंहच-ल्यानंतर मागाहून लक्ष्यांत आलें. हा वेळपर्यंत काकासाहेबांनीं एकनाथी भाग-वताचीं कितीतरी पारायणें केलीं असतील; पण या सोमवारी सकाळीं त्यांचे वाचनांत आलेला भाग म्हणजे अष्टमहासिद्धींचे वर्णन ( पहा ए. भा. अ. १५, श्लोक १० ते २३ ). त्यावेळीं काकासाहेबांनीं अखेरीस ज्या श्लोकावर प्रवचन केलें तो हा "परकायंविशन् सिद्ध आत्मानं तत्रभावयेत । पिंडंह्त्विा विशेत्प्राणो वायु भूतः षडंघ्रिवत् ( ए. भा. अ. १५, श्लोक २३ ). या श्लोकावर नाथ-महाराजांची टीका फारच सुंदर आहे व ती काकासाहेबांचे प्रेमळवाणीनें ऐक-ण्याचा अपूर्व योगही हा अखेरचाच होता. असो ईश्वरी इच्छा !

श्रीसद्गुरू साईबाबांच्या आज्ञेप्रमाणें काकासाहेब दररोज दिवसा एकनाथ भागवत व रात्रौ भावार्थ रामायण नियमानें वाचीत असत. या संबंधींची हकीगत पुढें क्रमानें त्यांच्या वानप्रस्थाश्रमाचे वेळीं येईल. दोन प्रहरीं पाऊस थांबून उघाड पडली व मुंबईस डॉ. देशमुखांचे दवाखान्यांत जाण्याकरितां काकासाहेब निघाले. त्यांचेबरोबरच अण्णासाहेब व तेंडुल्कर ही मंडळी वांद्र्यास जाण्याकरितां निघाली. पार्ले स्टेशनवर १२-५९ ची गाडी थोडी उशीरां आल्यामुळें ते प्लॅटफॉर्मवर येऊन पोंहचतांच ती त्यांना मिळाली. गाडींत पाऊल टाकतांच काकासाहेब महाराजांचे गुणानुवाद गाऊं लागले. ते म्हणाले, "पहा अण्णासाहेब, बाबा किती दयाळू आहेत. आप-ल्याला येतांक्षणींच गाडी मिळवून दिली. एक मिनिटाचा सुद्धां खोळंबा केला नाहीं. पुढें गाडींत बसल्यावर खिशांतून लहान टाईमटेबल काढून पाहून म्हणाले पहा ही गाडी आपल्या करितां लेट करून बाबांनीं आपल्यास मिळवून दिली. नाहीं तर स्टेशनवर आपल्यास खोळंबावें लागतें व हें केवळ महाराजांच्या कृपेनेंच टळलें. असे गुणानुवाद सुरू असतां व डब्यांत अण्णासाहेब व काकासाहेब हे समोरासमोर खिडकीजवळ बसलेले, गाडी पुढचें स्टेशन म्हणजे सांताक्रुझ याच्या आसपास आली व बोल्तां बोलतां काकासाहेबांच्या शरी-

राचा तोल जाऊन त्यांना झोंप येत आहे असें अण्णासाहेबांस आरंभी वाटलें. म्हणून अण्णासाहेब उठून त्यांचे बाजूला बसून त्यांची मान सांवरून झोंपावयाचें आहे काय म्हणून विचारतां जेव्हां उत्तर मिळालें नाहीं तेव्हां त्यांना मूर्च्छा आली असावी असें अण्णासाहेबांस वाटलें व त्यांनीं लगेच आपल्या उपर्ण्याची गुंडाळी करून त्यांच्या उशाला दिली. व त्यांना शुद्धीवर आणण्याकरितां पाणी पाहूं लागले. डब्यांत एकाजवळ भांडें मिळालें. इतक्यांत गाडी सांताक्रूझ सुटून खार स्टेशनवर आली. तेथें अण्णासाहेब खालीं उतरले व नळाचें पाणी मिळविलें; पण इतक्यांत गाडी सुरू झाल्यामुळें ते घाईघाईनें डब्यांत शिरले. व काकासाहेबांचे डोक्यावर व तोंडावर आणि डोळ्यावर खूब पाणी शिंपडलें. तथापि शुद्धीवर आल्याचें कांहींही चिन्ह जेव्हां दिसेना तेव्हां तेंडुलकर व अण्णासाहेब हे दोघेही फार अस्वस्थ झाले व वांद्र्यास गाडी आल्यावर काकासाहेबांस तेंडुलकरांचे हवालीं करून झालेली हकिगत गार्डास सांगून काकासाहेबांस खालीं उतरण्याची तजवीज करावी म्हणून अण्णासाहेब डब्यांतून खालीं उतरून गार्डास कळविण्यास व त्याची मदत मागावयास बाहेर पडले. त्यावेळीं पाऊस सोसाट्यानें आल्यामुळें व प्यॅसेंजरची गर्दी असल्यामुळें गाडीचे डब्याजवळ जाऊन पोंचतात तों गाडी सुटली. मग तेथेंच एका डब्यांत शिरून गाडी जेव्हां माहिम. स्टेशनवर उभी राहिली तेव्हां खालीं उतरले व गार्डास सर्व हकीकत कळविली व काकासाहेबांस तेथें बाहेर काढण्यास मदत मागितली. परंतु गार्डानें तेथें कांहींच सोई नाहीं 'टेली फोन' करून परळच्या स्टेशनावर 'स्ट्रेचर' माणसें व डॉक्टर मागविण्याची व्यवस्था करवितों व तेथें आपण त्यांना खालीं घेऊं आणि तपासूं असें गार्डानें सांगितलें व गाडी तशींच पुढें गेली. अण्णासाहेबांचा समज काकासाहेब मूर्छना येऊन पडले आहेत व योग्य इलाजा नंतर शुद्धीवर येतील असाच होता. गाडी परेलवर आली. व्यवस्थितरीतीनें काकासाहेबांना डब्यांतून बाहेर काढले. डॉक्टर हजर होतेच. त्यांनीं काकासाहेबांना तपासून हृदयाची क्रिया बंद पडल्यामुळें, "त्यांचा प्राण कुडींतून निघून गेला" असा अभिप्राय दिला.

(अपूर्ण)

* स्फुटविषय पहा अध्याय ४२ ओवी ३१ खालील टीप.

## कै० वा० रघुनाधराव तेंडूलकरांचे उद्गार.

### अभंग.

कोठें देव गेला टाकूनी मजला । नसे विश्रांतीला ठाव आतां ॥ १ ॥
कुणा संगें बोलूं गुज कुणा सांगूं । कुठें तुला शोधूं कळेना तें ॥ २ ॥
गोड गोड शब्दें परमार्थज्ञान । दिधलें सांगून भक्तजनां ॥ ३ ॥
करावा विवेक होत नाहीं शांती । झाली माझी मती कुंठित ही ॥ ४ ॥
कसें माझे तोंडीं बोलूं तूं नाहींस । गमे वसलास हृदयांत ॥ ५ ॥
दासी म्हणे बाबा होते चळवळ । मनाची प्रबळ प्रसंगीं या ॥ ६ ॥

२

### अभंग.

ज्ञानहीना मज गेलां सोडुनीयां । आतां कुणा पायां लागूं मी हो ॥ १ ॥
अडल्या प्रसंगीं भार तुम्हावर । होता गुरुवर माझा कीं हो ॥ २ ॥
किती अश्रू गाळूं आठवुनी प्रेमा । पोटीं दया क्षमा होती तुम्हां ॥ ३ ॥
दास म्हणे हाय हाय जीवा झाली । माझे हो माउली बाबा साई ॥४॥

३

### अभंग

कंटाळलां तुम्ही काय आम्हांसाठीं । गेलां-उठाउठी म्हणूनीयां ॥ १ ॥
मुग्ध होउनीयां कैसे हो वैसलां । नाहीं हो बोललां कोणासंगें ॥ २ ॥
जरी प्रयाणाचा वेळ तो कळला । निरोप धाडिला नाहीं कुणा ॥ ३ ॥
प्रेमा दाखवूनी माया हो लाविली । आतां हो माउली कोणा पाहूं ॥४॥
पूर्वीं देवभक्त असेच ते गेले । कीर्तीस ठेविलें पाठीमागें ॥ ५ ॥
होते आठवण प्रेमळ शब्दांची । करितों मनाची समजूत ॥ ६ ॥

सद्गुरू सद्गुरू करा समाधान । दृष्टान्त देऊन भक्तजना ॥ ७ ॥
सगुण सोडून निर्गुणांत गेलां । भक्तास ठेविला विव्हळत ॥ ८ ॥
नकळे आदेश काय हो ठेविला । कळे तो मनाला नाहीं शांति ॥ ९ ॥
पूर्ण कृपादृष्टी होती दासावरी । तीच निरंतरीं असो द्यावी ॥ १० ॥

४

## अभंग.

न होतें चिंतिलें ऐकूं तेंचि आलें । ब्रह्मीभूत झाले बाबासाई ॥ १ ॥
आतां कोणा पाहूं कोणाला मी भजूं । चरण मी धरूं कोणाचे ते ॥२॥
किती बतावणी केली तुम्ही बाबा । मनावरी तावा ठेववेना ॥ ३ ॥
बहुत सोशिले आम्हांसाठीं कष्ट । परी तें वितुष्ट माजलेलें ॥ ४ ॥
भांडणें तांडणें नित्य नित्य झालीं । आज्ञा हो पाळिली नाहीं कुणी ॥५॥
रहा आतां सुखें आपुल्या हो घरीं । पहा हो अंतरीं मुरडून ! ॥ ६ ॥
सांभाळिलें आम्हां येवढें करून । सुबोध देऊन वारंवार ॥ ७ ॥
माय हो माउली दीनाची साउली । भाविकां पावली दास म्हणे ॥ ८ ॥

## अभंग.

## बाबांचा संदेश.

" नका करूं शोक नका वाहूं चिंता॥नाहीं मी परता गेलों कुठें " ॥१॥
" तुमचें कर्तव्य तुम्हा पढविलें । जागृत ठेविलें पाहिजे तें ॥ २ ॥ "
" आपुलाला धडा विश्वासें वळवावा । दृढभाव ठेवा मजवरी " ॥ ३ ॥
" मशीदीचें ठाणें जागृत ठेवावें । ऐसे शब्द देवें काढियेले ॥ ४ ॥
सद्गुरुकृपेनें आले हे उद्गार । सुबुद्धि देणार तोचि मज ॥ ५ ॥
दास म्हणे देवा करितों नमन । पाय आठवून हृदयांत ॥ ६ ॥

## श्रीसद्गुरु साईबाबायनमः

सप्रेम सा. न. वि. वि. आपल्या सन्मान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकी खालीं लिहिलेल्या लीलानुभवास कृपेनें स्थल मिळावें :अशी नम्रता पूर्वक विज्ञप्ति आहे.

### स्रग्धरावृत्तम्

दृष्ट्वा यद्ब्रह्मतेजः शुचि मधु रुचिरं शीतलं चित्तहारी ।
पूर्णेंदुःक्षीणकांति र्भवति किल तथा दर्पको नष्टदर्पः ।
श्रुत्वा यत्प्रेमवीचीः प्रियजन विषये लज्जितो भाति सिंधुः ।
तत्श्रीसाई पदाब्जे मम नतिततयः कोटिशः संतु नित्यम् ।

अर्थः– ज्यांचें निर्मल, गोड, सुंदर, थंड, व मनोवेधक ब्रह्मतेज पाहून खरोखरच पौर्णिमेचा चंद्र तेजोहीन होतो व त्याचप्रमाणें सौंदर्याचा गर्व वाहणारा मदन गर्वहीन होतो, तसेंच आपल्या प्रियभक्तांच्या ठिकाणीं ज्याच्या प्रेमलहरी संबंधी कथा ऐकून समुद्र लज्जायमान होतोसा दिसतो, त्या श्री साईपदकमलीं माझ्या नित्य कोट्यावधि प्रणामपंक्ति असोत.

श्रीसाईबाबांचे दर्शनास एके दिवशीं एक मुसलमान आला. दर्शन घेतल्यावर त्यानें प्रार्थना केलीं कीं बाबा मला सुरुंगी दारूचा व बत्त्यांचा परवाना मिळत नाहीं मी कलेक्टर साहेबांकडे पुष्कळ अर्ज केले परंतु माझी दादच लागत नाहीं. म्हणून आतां आपल्याकडे आलों आहे. कसेंही करून माझी दाद लावा. या शिवाय मला आपल्याजवळ दुसरें कांहीं एक मागावयाचें नाहीं. महाराज म्हणाले. बरें नानाला येऊं दे म्हणजे तुला परवाना द्यायला मी त्याला सांगेन. कांहीं दिवसांनी नानासाहेब महाराजांचे दर्शनास आले व हा मुसलमानही त्याच वेळीं तेथें आला. व महाराजांस सांगूं लागला कीं बाबा आतां नानासाहेब येथें आले आहेत त्यांना परवाना देण्याबद्दल तुम्ही सांगा. महाराज नानासाहेबांस म्हणाले, नाना, या मुसल्मानास तो

मागत असलेला परवाना दे. नानासाहेब म्हणाले, या मुसलमानानें दोन अर्ज केले होते. व दोन्ही वेळीं त्यास परवाना देऊं नये म्हणून कलेक्टर साहेबांचा हुकूम झाला आहे. तेव्हां आतां त्यास परवाना मिळणार नाहीं. परंतु महाराज म्हणाले, दे रे नाहीं म्हणूं नकोस. नानासाहेब म्हणाले दोनदां साहेबांनींच स्वत: परवाना देण्याचें नाकारिलें आतां त्यास तो कसा मिळेल व मीही साहेबांस काय सांगूं ? महाराज म्हणाले तूं आतां साहेबांना सांग म्हणजे तो देईल. हे बघ या मुसलमानाची एक पेटी आपल्याकडे आहे. तो ती आतां आपल्याजवळ मागतो आहे. आपल्याजवळ आतां ठेवण्याची त्याची इच्छा दिसत नाहीं. मग ती ठेवून घेण्याचा विनाकारण आग्रह धरण्यांत काय मतलब ? त्याची त्याला देऊन टाकावी हें बरें. नानासाहेब म्हणाले, महाराज आपण म्हणतां हें सर्व खरें. पण आतां मी साहेबांस सांगूं काय ? महाराज पुन: म्हणाले, तूं सांग म्हणजे तो आतां देईल. नानासाहेब म्हणाले बरें आपण सांगतां त्याप्रमाणें आणखी एकवार म्हणून पाहतों. नंतर नानासाहेबांनीं त्या मुसलमानास पुन्हा तिसऱ्यावेळीं अर्ज करण्यास सांगून अमक्या तारखेस अमक्या वेळीं अमक्या ठिकाणीं हजर राहाण्यास सांगितलें. व अर्ज जेव्हां पुकारले जातील त्यावेळीं तूं आपला अर्ज घेऊन ये व तुझी जी हकीकत असेल व ज्या कामासाठीं परवाना तुला पाहिजे असेल तें काम साहेबांस समक्ष सांग असें त्यास म्हणाले. नंतर लवकर त्या मुसलमानानें तसें केलें. सायंकाळीं अर्ज पुकारले त्यावेळीं हा गृहस्थ अर्ज घेऊन साहेबापुढें उभा राहिला. साहेबांनीं नानासाहेबांस हकीकत विचारली, नानासाहेब म्हणाले या अर्जदाराचा हा तिसरा अर्ज आहे. हा सुरंगी दारू व बत्त्यांचा परवाना मागत आहे व तो त्यास देऊं नये असा आपला दोन्ही वेळां नुकताच हुकूम झाला आहे तरी तो फिरून अर्ज करीतच आहे. साहेब म्हणाले या अर्जदारास सुरंगी दारू व बत्त्या कशासाठीं पाहिजे आहेत ? नानासाहेब म्हणाले त्याचे शेतांतील खडक फोडून शेतास ताली बांधण्या करितां वरील परवान्याची जरूर आहे असें तो म्हणतो. पण

तालुक्याहून आलेल्या माहितीवरून त्यास परवान्याची जरूर आहे असें न वाटल्यावरून त्यास परवाना देण्याचें आपणच नाकारलें आहे. नंतर साहेबांनीं त्या अर्जदारास जवळ बोलावून परवान्याची इतकी जरूर काय आहे म्हणून विचारलें, तेव्हां तो म्हणाला कीं अहो साहेब, मी सरकारांतूनच शेत सुधारणे करितां व त्याची बांधबंदिस्ती करण्याकरतां ५०० पांचशें रुपये तगाई घेतली आहे. व मीं मागतों तितक्या दारूचा व बत्तीचा मला जर परवाना मिळाला नाहीं तर तगाईच्या शर्तींत लिहिल्याप्रमाणें मजकडून मुदतशीर शेतसुधारणा व बांधबंदिस्ती कशी होईल ? शेत कसें पिकेल ? व सरकारचे तगाईचे हप्तेही वक्तशीर कसे जातील ? इतकें ऐकल्यावर साहेब म्हणाले कीं अर्जदार म्हणतों ती गोष्ट अगदीं खरी दिसते व अशी जर हकीकत होती तर प्रथमतःच ही गोष्ट आमचे नजरेस कां आणिली नाहीं ? आतांचे आताच याचा परवाना तयार करा माझी सही घ्या व त्याला द्या. मागील सर्व हुकूम रद्द समजा. नंतर साहेबांचे आज्ञेप्रमाणें परवाना त्याचवेळीं तयार होऊन त्यावर साहेबांची सही होऊन तावडतोब त्या गृहस्थास मिळाला. पूर्वीचे दोन वेळां ही तगाईची हकीकत कोणाच्याच कशी लक्षांत येऊं नये व ती आतांच कां यावी याबद्दल त्या त्रिकालज्ञ विश्वव्यापक साई परब्रह्मावांचून कोण काय सांगणार ? खरोखरच त्याची लीला अगम्य व अतर्क्य आहे. मी विचारिलें कीं नानासाहेब त्या गृहस्थानें महाराजांचे जवळ कसली पेटी ठेविली होती व केव्हां ठेविली होती व त्यानें ती केव्हां मागितली व महाराजांनी ती त्यास केव्हां दिली ! नानासाहेब म्हणाले अहो पेटी म्हणजे सत्कृत्य. त्या गृहस्थानें पूर्वजन्मीं केव्हांतरी महाराजांच्या जवळ कांहींतरी एक सत्कृत्य केलें. व त्याचें फळ तो आतांच या रूपानें मागूं लागला. म्हणून ते म्हणाले कीं त्याचें फळ आपण त्यास देऊन टाकूं व तें त्यांनीं त्यास या रूपानें दिलें.

एकदां नानासाहेब श्रीचे जवळ नेहमीं प्रमाणें एकटेच गोष्टी बोलत-बसले असतां दोन यवन स्त्रिया दर्शन घेण्याकरितां मशिदींत आल्या व मशि-

दीच्या खालच्या अंगणांत उभ्या राहिल्या. बराच वेळ झाला तरी त्या वर येईनात. आपण बसल्यामुळें त्या स्त्रियां दर्शन घेण्यास वर येत नाहींत असें नानासाहेबांस वाटल्यामुळें ते उठून जाऊं लागले. महाराजानीं त्यास खालीं बसविलें व उठून कां जातोस म्हणून विचारलें. नानासाहेब म्हणाले, त्या दोन स्त्रिया केव्हांपासून आपल्या दर्शनासाठीं आल्या असून खालीं तिष्ठत उभ्या राहिल्या आहेत. मी येथें आपल्या जवळ बसलों असल्यामुळें त्या वर येण्यास लाजत आहेत असें मला वाटतें म्हणून मी उठलों त्यांचे दर्शन झाल्यावर मी पुनरपी आपल्या जवळ बसेन. महाराज म्हणाले, बैस.खालीं जाऊं नकोस त्यांना जरूर असेल तर त्या वर येतील. तुला उठून जाण्याचें कारण नाहीं, ज्यांना लाज वाटत असेल त्यांनीं दर्शनास यावें कशाला ? नानासाहेब पुढें कांही एक न बोलतां ईशाज्ञे प्रमाणें पूर्ववत् महाराजांचे जवळ बसले. कांहीं वेळ वाट पाहून नानासाहेब बाबांजवळून उठत नाहींत असें पाहून त्या स्त्रिया वर आल्या. त्या पडदानसीन बाया होत्या. त्यांनीं वर आल्यावर आपल्या मुखावरील बुरखा दूर केला व श्री सद्गुरुरायांच्या चरणांचें वंदन केलें व पुन्हा पूर्ववत् मुखावर बुरखा घेऊन महाराजांचे जवळ बसल्या. त्यांपैकीं एक स्त्री वृद्ध होती व दुसरी अगदीं तरुण असून फार सुंदर होती. त्यावेळीं नानासाहेब तिच्या सौंदर्यानें थोडे विकारवश झाले व ती सुंदरी आणखी एकवेळ आपला बुरखा काढून टाकून तिचा वदनशशि पुन्हां एकवार आपल्यास पहावयास मिळेल तर बरें असें त्यांस वाटलें. इतकें मनांत येतांच महाराजानी नानासाहेबांचे मांडीवर एक थापट मारली. नंतर त्या स्त्रिया पुनरपि बुरख्यासह श्रींच्या शुचितम व पुण्यकारक पाद पद्माचें वंदन करून निघून गेल्या. त्यानंतर महाराज म्हणाले, नाना थापट कां मारली त्याचें कारण कळलें कां ? नानासाहेब म्हणाले सर्वज्ञ गुरु माउलीपासून मी काय चोरून ठेवणार ! परंतु आपले सान्निध्यांत बसलों असतां सुद्धां क्षुद्र विकारांनी मजवर अंमल कां चालवावा हें मात्र मला कळत नाहीं. महाराज म्हणाले नाना तूं तरी मनुष्यच आहेस ना ? शरीर

हें विकारांनींच बनलेलें आहे व विकार वस्तु दृग्गोचर झाल्याबरोबर उठणारच; पण कायरे बाहेरून दिसण्यांत मनोहर सुंदर रमणीय अंतःकरणास चकित करून सोडणारी मोहक नक्षीकाम केलेलीं व नानातऱ्हेच्या चित्रविचित्र रंगांनी रंगवलेली अशीं देवालयें जगांत काय थोडीं आहेत! पण आपण जे अशा देवालयांत जातों ते फक्त देवाल्याचें बाह्य स्वरूप पहाण्यास जातों का आंतील देवाचें दर्शन घेण्यास जातों? देवदर्शन घेते वेळी आपल्यास देवाल्याच्या मनोवेधक बाह्य स्वरूपाबद्दल काय वाटतें? आपण देवाल्याच्या बाह्य स्वरूपाकडेंच पहात बसतों कीं आंतील परमात्म मूर्तीबद्दल विचार करतों! अरे आपणास असें नाहीं कां वाटत कीं हे परमात्म्या आपलें मंदीर किती चित्ताकर्षक आहे व त्यांत आपण कसें सुंदर शोभतां तसेंच प्रत्येक वस्तूंत परमात्मा भरलेला आहे. ती वस्तु सुरूप असो अथवा कुरूप असो. आपणास बाह्य सुस्वरूपाचा अथवा कुस्वरूपाचाच विचार करावयाचा नसतो. फक्त त्या वस्तूंतील परमात्मस्वरूपाचाच विचार करावयाचा असतो. वस्तूच्या बाह्य स्वरूपाकडे मुळींच लक्ष देऊं नये असें नाहीं. फक्त बाह्य स्वरूप चित्तवेधक असल्यास त्याकडे नजर गेल्याबरोबर इतकेंच मनांत आणावें कीं हे परमात्मा इतक्या विशाल व कुशाग्र बुद्धीनें व कल्पनातीत कुशलतेनें तयार केलेल्या या मोहक शरीररूपीं देवालयांत आपण कसा निवास केला आहे व कसें विभूषित दिसत आहां. नाना, आतांच ज्या तरुण यवन स्त्रीचा चेहरा पुनरपि पहाण्याची तुला इच्छा झाली ती, तूं वर सांगितल्याप्रमाणें तिच्या प्रथम दर्शनाचे वेळींच जर विचार केला असतास तर तिचा चेहरा पुन्हा पहाण्याची तुला इच्छाच झाली नसती. असो. आतां हीच गोष्ट निरंतर लक्षांत ठेव म्हणजे झालें. प्रपंचांत राहून सर्व व्यवहार करून विचारांनीं विकार कसे दुर्बल करावे व परमार्थ कसा साधावा याबद्दल महाराजांच्या अद्वितीय व परम कारुणिक शिकवणुकीचें व त्यांच्या निरुपमेय व अगाध ज्ञानाचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच.

एकदा नानासाहेबांच्या वडिलांचा व कल्याणचे मुसल्मानांचा थोडासा बेबनाव झाल्यामुळें त्यांनीं घरांत ताकीद देऊन ठेविली कीं आजपासून आपल्या

घरीं कोणत्याही मुसलमानास येऊं द्यावयाचें नाहीं व बोलवावयाचें नाहीं व आपल्या घरच्या कोणत्याही मनुष्यानें कोणत्याही मुसलमानाचे घरीं जावयाचें नाहीं. त्यावेळीं नानासाहेब बाहेरगांवीं नोकरीवर होते. व त्यांस त्यांचे वडिलांनीं घरांतील सर्व माणसांस वरीलप्रमाणें केलेली ताकीद माहीत नव्हती. नानासाहेब जसे डेप्युटी कलेक्टर होते तसे त्यांचे वडीलही डेप्युटी कलेक्टरच होते. ते दप्तरदाराचें काम करीत असत म्हणून त्यांस दप्तरदार म्हणत असत. हल्लींही कल्याणांत त्यांचे वाडयास दप्तरदारांचा वाडा असेंच म्हणतात. नानासाहेबांच्या वडिलांचें नांव गोविंदपंत नानाचांदोरकर. त्यांसही लोक नानासाहेब म्हणूनच संबोधीत असत. नानासाहेबाचें कल्याणास व इतरत्र मुसलमान स्नेही फार. वडील पेन्शनर होते व वयोवृद्धही होते. त्यांनीं मुसलमाना संबंधानें वरीलप्रमाणें केलेला नियम त्यांना स्वत:पाळण्यास कोणत्याच प्रकारें हरकत नव्हती. तसेंच घरांतील बायकामुलांनाही त्या प्रमाणें वागण्यास कसलीही हरकत नव्हती. पण नानासाहेबांचें कसें चालणार ? ते संस्कृत आंग्ल व मातृभाषा विशारद असल्यामुळें व मोठ्या हुद्याच्या सरकारी नोकरीवर असल्यामुळें त्यांचे नेहमीच काम त्यांच्या बाळपणच्या मुसलमान संवगडयांशीं. शाळेंतील व कॉलेजमधील मुसलमान मित्रांशीं व सरकारी कामासंबंधानें विचारपूस करणाऱ्या अगर सल्लामसलत विचारणाऱ्या मुसलमान सद्गृहस्थांशीं असे व त्यामुळें कधीं त्यांचे वरील जातीचे स्नेही त्यांचे घरीं येत अगर त्यांस त्यांचें घरीं जावें लागे. नानासाहेब कांहीं कारणांनीं कल्याणास घरीं आले तेव्हां त्यांस मुसलमाना संबंधानें वरील प्रमाणें नवीन ताकीद केल्याचें कळलें. तेव्हां आतां अशा स्थितींत काय करावें याबद्दल त्यांस मोठीच पंचाइत पडली.

नानासाहेब पितृभक्त व पित्राज्ञाधारक होते. वडील जुन्या काळचें जुन्यामताचे असून करारी स्वभावाचे होते. त्यांनीं केलेल्या नियमाबद्दल त्यांचे पुढें बोलणार कोण ! वडलांनीं केलेल्या नियमाप्रमाणें वागावें तर जवळ जवळ सर्वच व्यवहार बंद पडण्याची वेळ येईल.न वागावें तर वडिलांचा अपमान होऊन त्यांना राग येईल.याप्रमाणें नाना साहेबांस दुहेरी पेंच पडला व आतां

काय करावें हें त्यांस सुचेना. परंतु विश्वरंग भूमीवर अदृश्य राहून जगत्सूत्रधाराचें बिकट काम सहज लीलेनें व अद्वितीय कुशलतेनें करणाऱ्या श्रेष्ठ साई नटवराचे विलक्षण खेळ कोणास कळणार ! नानासाहेबांनीं विचार केला कीं आपण आपल्या सर्व अडचणी वडिलांपुढें मांडाव्या व त्यावर त्यांचें म्हणणें काय पडतें तें पहावें. नानासाहेबांस जी विशेष व सर्वांत अतिकडक अडचण भासली ती वरील अडचणीपेक्षां फारच निराळी होती, व म्हणूनच नानासाहेबांस मित्राज्ञा पाळणें अशक्यच होऊन बसलें होतें. परंतु प्रिय सद्भक्तांस कोणती अडचण आली आहे त्याचें मन कोणत्या संशय पिशाचिकेनें घेरलें आहे व तो पुढें काय प्रश्न करणार आहे त्याची जाणीव अगोदरच श्रीसद्गुरु मउलीस असते. व याचा मधुरानुभवास्वाद श्री ज्ञानेश्वरी वाचक भक्तांस. श्रीज्ञानेश्वरींत कृष्णार्जुन देवभक्त संवादांत ठिकठिकाणीं यथेच्छ चाखावयास मिळतो.:विश्वनाटकाचार्य श्रीगुरुरायांनीं नानासाहेबांचे वडिलांस एक अपवादात्मक प्रेरणा अगोदरच करून ठेविली होती. ती केव्हां केली होती कोण जाणें. पण केली होती हें खास. तिचें ज्ञान नानासाहेबांस मुळींच नव्हतें. म्हणूनच त्यांस पेंचांत पडल्यासारखें वाटलें. असो. नानासाहेबांनीं मोठ्या धैर्यानें वर प्रमाणें आपल्या अडचणी वडिलांपुढें मांडल्या व म्हणाले कीं श्रीसाई बाबा म्हणून कोणी एक समजले गेलेले मुसलमान संतवर्य नगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत शिर्डी गांवीं असतात. व त्यांचेकडे तर मी नेहमीं जातों. व त्यांच्याकडे न जाणें म्हणजे ही एक पारमार्थिक बाबतींत मोठीच अडचण आहे. बाकीच्या अडचणी कदाचित् कशातरी दूर करतां येतील. पण या अडचणीस काय करूं. त्यांचेकडे जात जाऊं कां नको ! मला हेंही माहीत आहे कीं आपले गुरुस्थान ठाणें जिल्ह्यांत भिवंडी तालुक्यांत कवाड गांवीं आहे. व त्या ठिकाणीं निवास करणारे श्रीसमर्थ सखाराम महाराज हे आपली गुरुमाय आहेत. ते ब्राम्हण आहेत. यावर नानासाहेबांचे वडील म्हणाले, "अरे शिरडीचे साईबाबा जरी खरे मुसलमान असले तरी तेच तुझे गुरू आहेत व त्यांचेचकडे तूं जात जा. श्री सखाराम महाराज हे तुझे गुरु नव्हत." हें ऐकून नानासाहेबांस अत्यानंद झाला व त्यांचे नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून आले. व बाबांनीं आपले वडलांस

ही एवढीच अपवादात्मक प्रेरणा कशी केली याबद्दल त्यांस त्या गुरुमाउलीचें राहून राहून कौतुक वाटूं लागलें. व आपले गुरू श्री साइबाबाच आहेत हें आपले वडलांस कसें समजलें व त्यांचे गुरू श्री सखाराम महाराज असतां, साईबाबाच तुझे गुरू आहेत हें त्यांनीं खात्रीनें कशावरून सांगितलें याचा त्यांस उलगडा होईना. परंतु त्याबद्दल वडलांकडून खुलासा करून न घेतां ही त्याच साई ब्रम्हांड चालकाच्या अनंत लीलेपैकीं एक लीला आहे असें समजून बाबांवरील त्यांची श्रद्धा व भक्ती दृढावत चालली असो. असा जो विश्वकर्म्याचा विश्वकर्मा, विश्वपालकाचा पालक व विश्व संहारकाचा संहारक अनंत कोटि ब्रह्मांड नायक श्रीसाई परमात्मा त्याचे चरणारविंदीं अनन्यभावें शीर्षस्थित संस्कृत श्लोक रूपीं एक वाग्गुलाबपुष्प, अनुभवत्रयरूपीं एक त्रिदल वाग्बिल्व व मातृभाषेंतील शेवटील श्लोकरूपीं एक तुलसीदल अर्पण करून आपली रजा घेतों.

### रथोद्धता

कालिका-वर विहीन कालिका ।
पालका स्वजनबालबालिका ।
शालिका जग प्रपंच जालिका ।
चालका नमन साइमालिका ॥

ठाणें १९-९-२६

बाबांचें बाळ.

---

१ कालिका=दुर्गा=पार्वती. वर=भर्ता, रमण= शंकर.

२ विहीन=रहित. कालिका=कालिमा, अंधःकार, अज्ञान, दोष=अज्ञान रहित.

३ पालका=पालनकरणारा.

४ आपले स्त्रीपुरुष भक्त.

५ शालिका=जाळें विणणारा.

६ जालिका=जाळें. जगरूप प्रपंचाचें जाळें.

७ चालका=चालवणारा ( जगरूप प्रपंच )

८ मालिका=धनी, नायक ( ब्रह्मांडनायक )

# अध्याय ४२ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

ॐ नमोजी सद्गुरू दातारा । श्री मद्गोदातट विहारा ॥
ब्रह्ममूर्ते कौपीनांबरा । संतवरा नमो तुज ॥ १ ॥
दावी भवनंदी उतरूं । दीना दे निजपदीं अवसरूं ॥
तोहा भक्तकाज कल्पतरू । संतावतारू साईचा ॥ २ ॥
गताध्यायीं जाहलें कथन । गोड कथा नवल विंदान ॥
साई छबीचें जलनिमज्जन । टळूनि रक्षण झालें कसें ॥ ३ ॥
तैसीच एका भक्ताची कामना । साईनीं पुरविली येऊनि स्वप्ना ॥
लाविलें तया ज्ञानेश्वरी वाचना । देऊनि अनुज्ञा विस्पष्ट ॥ ४ ॥
सारांश गुरुकृपा उजियेडें । फिटे भवभयाचें सांकडें ॥
निश्रेयस मार्गद्वार उघडे । असुख रोकडें सुख होय ॥ ५ ॥
नित्य स्मरतां सद्गुरूचरण । विरे विघ्नांचें विघ्नपण ॥
मरणासीही येईल मरण । पडे विस्मरण भवदुःखा ॥ ६ ॥
म्हणोनि या समर्थाची कथा । श्रोतां परिसिजे अपुलाल्या हिता ॥
जयाचिया श्रवणें तत्वता । अति पावनता लाधेल ॥ ७ ॥

आतां ये अध्यायीं आपण । करूं या साईस्वभाव निरूपण ॥
कैसें मनाचें तीव्रपण । अथवा मवाळपण तयांचे ॥ ८ ॥

एकदां तात्याबा नूलकरांचे । स्नेही डॉक्टर पंडित नांवाचे ॥
घ्यावया दर्शन साईबाबांचें । आले एकदांचे शिर्डींत ॥ ९ ॥

पाऊल ठेवितां शिरडींत । आरंभीं गेले मशिदींत ॥
करुनि बाबांसी प्रणिपात । बैसले निवांत क्षणभरी ॥ १० ॥

बाबा मग वदती तयातें । जाई दादा भटाच्या येथें ॥
'जा असे जा' म्हणून हातें । लाविती मार्गातें तयास ॥ ११ ॥

दाते दादाकडे गेले । दादांनीं योग्य स्वागत केलें ॥
मग दादा बाबांचे पूजेस निघाले । येतां का विचारिलें दात्यांसीं ॥१२॥

दाते दादा समवेत गेले । दादांनीं बाबांचें पूजन केलें ॥
कोणीही न तोंवर लावाया धजले । गंधाचे टिळे बाबांस ॥ १३ ॥

कोणी कसाही येवो भक्त । कपाळीं गंध लावूं न देत ॥
मात्र म्हाळसापति गळ्यासीं फांसीत । इतर ते लावीत पायातें ॥१४॥

परी हे दाते भोळे भाविक । दादांची तबकडी केली हस्तक ॥
धरुनियां श्री साईचें मस्तक । रेखिला सुरेख त्रिपुंड्र ॥ १५ ॥

पाहूनि हें दात्यांचें साहस । दादांचे मनीं धासधूस ॥
चढतील बाबा परम कोपास । काय हें धाडस दात्यांचें ॥ १६ ॥

ऐसें अघडतें जरी घडलें । बाबा एकही न अक्षर वदले ॥
किंबहुना वृत्तीनें प्रसन्न दिसले । मुळीं न कोपले दात्यांवर ॥ १७ ॥

असो ती वेळ जाऊं दिली । दादाचे मनीं रुख रुख राहिली ॥
मग तेच दिनीं सायंकाळीं । बाबांस विचारली ती गोष्ट ॥ १८ ॥

आम्हीं गंधाचा उल्लासा टिळा । लावूं जातां अपुलिया निढळा ॥
स्पर्श करूं द्या ना कपाळा । आणि हें सकाळा काय घडलें ॥ १९ ॥

अमुचा टिळ्याचा कंटाळा । दात्याच्या त्रिपुंड्राचा जिव्हाळा ।
हा काय नवलाचा सोहळा । बसेना ताळा सुसंगत ॥ २० ॥

तंव सस्मित वदन प्रीती । साई दादांलागी वदती ॥
परिसावी ती मधुर उक्ती । सादर चित्तीं सकळिकीं ॥ २१ ॥

दादा तयाचा गुरु ब्राह्मण । मी जातीचा मुसलमान ॥
तरी मी तोच ऐसें मानून । केलें गुरुपूजन तयानें ॥ २२ ॥

आपण मोठे पवित्र ब्राह्मण । हा जातीचा अपवित्र यवन ॥
कैसें करूं याचें पूजन । ऐसें न तन्मन शंकलें ॥ २३ ॥

ऐसें मज त्यानें फसविलें । तेथें माझे उपाय हरले ॥
नको म्हणणें राहून गेलें । आधीन केलें मज तेणें ॥ २४ ॥

ऐसें जरी उत्तर परिसिलें । वाटलें केवळ विनोदें भरलें ॥
परी तयांतील इंगित कळलें । माघारा परतले जैं दादा ॥ २५ ॥

ही बाबांची विसंगतता । दादांच्या फारच लागली चित्ता ॥
परी दात्यांसवें वार्ता करितां । कळली सुसंगतता तात्काळ ॥ २६ ॥

धोपेश्वरीचे रघुनाथ सिद्ध । काका पुराणिक नामें प्रसिद्ध ॥
दाते तयांचे पदीं सन्नध । ऋणानुबंध शिष्यत्वें ॥ २७ ॥

दात्यांनीं घातला काकांचा ठाव । तैसाच तयांस आला अनुभव ॥
जया मनीं जैसा भाव । भक्ति प्रभावही तैसाच ॥ २८ ॥

आतां चित्त करूनि समाहित । परिसिलें आतांपर्यंत आचरित ॥
तैसेंच बाबांचें देहोत्सर्ग चरित । तेंही सुचित्त अवधारा ॥ २९ ॥

धन्य धन्य शिरडीचे लोक । जयां बाबांचें सहवास सुख ॥
अर्ध शतकाहुनीही अधिक । अति सुखकारक जाहलें ॥ ३० ॥

शके अठराशें चाळिसांत । दक्षिणायन प्रथम मासांत ॥
विजया दशमी शुक्लपक्षांत । दिवसा देहांत* बाबांचा ॥ ३१ ॥

नऊ तारिख मुसलमानी । कत्तलची रात्र तया दिनीं ॥
तिसरे प्रहरीं साई नाथांनीं । केली निर्याणीं तयारी ॥ ३२ ॥

बुद्धाची तैं बुद्ध जयंती । साईची तैं पुण्यतिथी ॥
देवादिकांची जी जयंती । तीच पुण्यतिथी संतांची ॥ ३३ ॥

साडे बाराचा घंटा पडला । दशमीचा काळ संपूर्ण झाला ॥
एकादशी आली उदयाला । निर्याण काळा एकादशी ॥ ३४ ॥

सूर्योदयाची उदयतिथी । तीच दसऱ्याची तिथी मानिती ॥
म्हणोन विजया दशमी धरिती । उत्सव करिती ते दिनीं ॥ ३५ ॥

मंगळवार कत्तलची रात । ऐसा तो दिवस अति विख्यात ॥
म्हणवूती ते दिनीं साई महंत । ज्योतींत ज्योत मिळविती ॥ ३६ ॥

वंगदेशींचा प्रसिद्ध सण । दुर्गापूजा समाप्ति दिन ॥
तो हा उत्तर हिंदुस्थानामधून । उत्सव दिन सकळांचा ॥ ३७ ॥

शके अठराशें आटतिसीं । विजया दशमीचेच दिवशीं ॥
सांयंकाळीं प्रदोष समयासीं । भविष्यासीं सूचविलें ॥ ३८ ॥

कैसें ती कथितों अपूर्व लीला । होईल विस्मय श्रोतियांला ॥
समर्थ साईच्या अकळ कळा । तेणें सकळां कळतील ॥ ३९ ॥

इसवीसन एकुणीससें सोळा । सण दसरा सिलिंगण वेळा ॥
फेरी परततां सायंकाळा । लीला अद्भूत वर्तली ॥ ४० ॥

---

* या संबंधानें श्रीसाईबाबांचे भक्त कै० वा० रा. रा. रघुनाथ रावजी तेंडुल्कर यांचे उद्गार. याच अंकांतील स्फूट विषयांत पहावे.

नभप्रदेशीं मेघ गडगडे । अवचित विद्युल्लता कडकडे ॥
तेवी जमदग्नी स्वरूप रोकडें । प्रगट केलें बाबांनीं ॥ ४१ ॥

सोडोनि शिरींचा सुडका । काढूनि कफनी तडका फडका ॥
फेडूनि कौपीन लंगोटा । केला भडका धुनींत ॥ ४२ ॥

आधींच तो अग्नी सोज्वळ । साह्य होतां आहुती प्रबळ ॥
उसळला शिखांचा कल्लोळ । भक्तांस घोळ पडियेला ॥ ४३ ॥

हें सर्व घडलें अवचितीं । नकळे काय बाबांचे चित्तीं ॥
शिलिंगण काळींची तीवृत्ति । महत्भीतिप्रद होती ॥ ४४ ॥

अग्नीनें पसरिलें निज तेज । त्याहून बाबा दिसले सतेज ॥
झांकोळले नयन सहज । पराङ्मुख जन झाले ॥ ४५ ॥

संत हस्तींचें हें अवदान । सेवूनि प्रसन्न अग्नीनारायण ॥
दिगंबर बनले ते जामदग्न्य । धन्य नयन देखल्यांचे ॥ ४६ ॥

त्वेषें टवकारिले नयन । क्रोधें झाले आरक्त नयन ॥
म्हणती करारे आतां निदान । मी मुसलमान कीं हिंदू ॥ ४७ ॥

गर्जोनि बाबा वदती पह्य जी । मी हिंदू कीं यवन आजी ॥
निर्धारा यथेच्छ मना माजी । आशंका घ्याजी फेडूनियां ॥ ४८ ॥

देखावा हा:अवलोकून । मंडळी झाली कंपायमान ॥
होईल कैसें शांतवन । नित्यचिंतनचाललें ॥ ४९ ॥

भागोजी शिंदा महाव्याधिष्ट । परि बाबांचा भक्त श्रेष्ट ॥
धीर केला आला निकट । नेसवी लंगोट बाबांशी ॥ ५० ॥

म्हणे बाबा हें काय चिन्ह । आज शिलिंगण दसऱ्याचा सण ॥
म्हणती माझे हेंच शिलिंगण । हाणिती सणसण सटक्यानें ॥ ५१ ॥

ऐणें परी धुनीपाशीं । उभे बाबा दिगंबरवेशी ॥
चावडी होती ते दिवशीं । घडते कैशी हे चिंता ॥ ५२ ॥

नवाची चावडी दहा झाले । परी बाबा नाहीं स्थिरावले ॥
लोक जागजागीं तटस्थ ठेले । टकमक उगले पाहती ॥ ५३ ॥

होतां होतां झाले अकरा । बाबाही तेव्हां निवळले जरा ॥
नेसोनियां लंगोटा कोरा । कफनी पेहराव मग केला ॥ ५४ ॥

चावडीची घंटा झाली । मंडळी होती तटस्थ बैसली ॥
पालखी फुलांनीं शृंगारली । अंगणीं आणिली आज्ञेनें ॥ ५५ ॥

रजतदंडपताका चवरी । छत्रध्वजादि राजोपचारीं ॥
श्रृंगारिलीसे मिरवणूक स्वारी । निघे बाहेरी एकांतरा ॥ ५६ ॥

झाला एकचि महागजर । साईनाथांचा जयजयकार ॥
काय वर्णावा तो गिरागजर । आनंदापूर लोटला ॥ ५७ ॥

मग शोधूनि शुभ्र धडका । बाबा डोक्यास गुंडीती फडका ॥
घेती चिलिमतमाखू सटका । जणूं तोच नेटका सुमुहूर्त ॥ ५८ ॥

कोणी छत्री कोणी चवरी । कोणी तीं मोरचेलें साजिरीं ॥
कोणी गरूडटके अबदागिरी । घेती निज करीं वेत्रदंड ॥ ५९ ॥

एणे परी करूनिया मीस । बाबांनीं सुचविलें सर्वत्रांस ॥
भवसागर सीमोल्लंघनास । दसराच एक सुमुहूर्त ॥ ६० ॥

तदनंतर एकचि दसरा । बाबांनीं दाखविला शिरडींकरां ॥
पुढीलचि दसरा सुमुहूर्त बरा । देहधरार्पण केला कीं ॥ ६१ ॥

हें न केवळ सूचविलें । स्वयें अनुभवा आणून दाविलें ॥
निज देह शुद्ध वस्त्र वाहिलें । योगाग्नींत हविलें येच दीनीं ॥ ६२ ॥

सन एकोणीससें अठरा । ते साळीचा तो सण दसरा ॥
तोच सुमुहूर्त केला खरा । निज परात्परा समरसले ॥ ६३ ॥

ऐसीच बाबांची आणीक प्रचिती । लिहितां लिहितां आठवली चित्तीं ॥
कीं याच विजया दशमीची तिथी । होती निश्चिती आधींच ॥ ६४ ॥

शिर्डीचे पाटील रामचंद्र दादा । झालें अति दुखणाईत एकदां ॥
जीवास सोसवती न आपदा । अति तापदायक भोगल ॥ ६५ ॥

उपाय कांहीं बाकी न राहिला । पडेना जंत्र दुखण्यास आला ॥
आला जीविताचा कंटाळा । अति कदरले पाटील ॥ ६६ ॥

होतां ऐसी मनाची स्थिती । एकें दिवशीं मध्यराती ॥
एकाएकीं बाबांची मूर्ति । त्यांचे उशागती प्रगटली ॥ ६७ ॥
तंव ते पाटील पाय धरिती । निराश होउनि बाबांस वदती ॥
कधीं येईल मज मरण निश्चिति । एवढेंच मजप्रती वदाजी ॥ ६८ ॥

आला आतां जिवाचा वीट । नाहीं मज मरणाचें संकट ॥
कधीं मज देईल तें भेट । पाहें मी वाट एवढींच ॥ ६९ ॥

तंवत्या बाबा करुणा मूर्ति । म्हणती न करी चिंता चित्तीं ॥
टळली तुझी गंडांतर भीति । किमर्थ खंती करिसीरे ॥ ७० ॥

तुजला नाहीं कांहींच भीती । तुझी हुंडी परतली पुरती ॥
परी न तात्याची धडगती । दिसे मज प्रती रामचंद्रा ॥ ७१ ॥

शके अठराशें चाळीस । दक्षिणायन आश्विनमास ॥
विजयादशमी शुक्लपक्ष । पावेल अक्षयपद तात्या ॥ ७२ ॥
परी न बोलावें तयापाशीं । हाय घेऊनि बैसले जीवाशीं ॥
झुरणीस पडले अहर्निशी । मरण कोणासीं आवडेना ॥ ७३ ॥
अवधी दोनच वर्षें उरलीं । तात्याची वेळा जवळ आली ॥
रामचंद्रास काळजी उद्भवली । बाबांची बोली वज्रलेप ॥ ७४ ॥
तात्यापासोन गुप्त ठेविली । बाळा शिंप्याचें कानीं घातली ॥
कोणा न कळवावी प्रार्थना केली । चिंता ती लागली उभयांतें ॥ ७५ ॥

---

*तात्या गणपत पाटील कोते

खरेंच रामचंद्र पाटील उठला । त्याचा विछाना तेथून सुटला ॥
दिवस मोजतां मोजतां लोटला । नकळत गेला तो काळ ॥ ७६ ॥

नवल बाबांचे बोलाचा ताळा । चाळीसाचा भाद्रपद सरला ॥
मास आश्वीन डोकाऊं लागला । तात्याबा पडला पथारीवर ॥ ७७ ॥

तिकडे तात्या तापानें अजारी । इकडे बाबांस भरली शिरशिरी ॥
तात्याचा भरंवसा बाबांवरी । बाबांचा श्रीहरी रक्षिता ॥ ७८ ॥

सुटेना तात्याचा विछाना । येववेना बाबांचे दर्शना ॥
अनिवार देहाच्या यातना । सोसवेना तयातें ॥ ७९ ॥

एक तो निजव्यथाव्यथित । बाबापाशीं लागलें चित्त ॥
नाहीं चालवत ना हालवत । दुखणेंही वाढत गेलें तें ॥ ८० ॥

इकडे बाबांचें कण्हणें कुंथणें । दिवसें दिवस वाढलें द्विगुणें ॥
हां हां म्हणतां तेंही दुखणें । अनावरपणें हटेना ॥ ८१ ॥

म्हणतां म्हणतां जवळ आला । दिवस बाबांनीं जो भाकित केला ॥
बाळा शिंप्यास घाम सुटला । तैसाच पाटिला रामचंद्रा ॥ ८२ ॥

म्हणती बाबांचे खरें होतें । ऐसेंच आतां वाटूं लागलें ॥
बरवें न कीं हें चिन्ह दिसतें । प्रमाण वाढतेंच दुखण्याचें ॥ ८३ ॥

झालें आली शुद्ध दशमी । नाडी वाहूं लागली कमी ॥
तात्या पडला मरणसंभ्रमी । आप्तेष्टश्रमी जाहले ॥ ८४ ॥

असो पुढें नवल वर्तलें । तात्यांचेंही गंडांतर टळलें ॥
तात्या राहिले बाबाच गेले । जणुं मोबदले केले कीं ॥ ८५ ॥

पहा आतां बाबांची वाणी । नांव दिधलें तात्याचें लावुनी ॥
केली तयारी निज प्रयाणीं । वेळा न चुकवुनि अणुभर ॥ ८६ ॥

नाहीं म्हणावें तरी ही सूचना । देवुनी आणिलें भविष्य निदर्शना ॥
गोष्ट घडेपर्यंतही रचना । दिसली न मना कवणाचे ॥ ८७ ॥

जन म्हणती तात्यांचें मरण । निज देहाचा बदला देऊन ॥
बाबांनीं ऐसें केलें निवारण । तयांचें विंदान त्यां ठावें ॥ ८८ ॥

बाबांनीं देह ठेविलियारातीं । अरुणोदयीं सुप्रभातीं ॥
"बाबा स्वप्नांत पंढरपुराप्रती । दृष्टांत देती गणुदासा" ॥ ८९ ॥

"मशीद पडली ढांसळोनी । अवघे शिरडीचे तेली वाणी ॥
"त्रासवूनि सोडिलें मजलागुनी । जातों तेथूनि मी आतां" ॥ ९० ॥

"म्हणोनि आलों येथवरी । फुलांही मज बरखळ डबरी" ॥
"इच्छा एवढी पुरी करो । चल झडकरी शिरडींत" ॥ ९१ ॥

इतुक्यांत शिरडीहून पत्र जातां । कळली बाबांची समाधिस्थता ॥
ऐकूनि गणुदास निघाले ही वार्ता । क्षण न लागतां शिरडीस ॥ ९२ ॥

सवें घेऊनि शिष्य परिवार । येऊनिया समाधी समोर ॥
मांडिला कीर्तन भजन गजर । अष्टौप्रहर नामाचा ॥ ९३ ॥

हरिनामाचा कुसुमहार । स्वयें गुंफोनि अति मनोहर ॥
प्रेमें चढविला समाधीवर । अन्नसंतर्पण समवेत ॥ ९४ ॥

ऐकतां नामाचा गजर अकुंठ । शिरडी गमली भूवैकुंठ ॥
नामघोषाची भरली पेठ । करविली लूट गणुदासीं ॥ ९५ ॥

दसऱ्याचीच कां बाबांस प्रीति । कीं तो मुहूर्त साडे तीन मुहूर्तीं ॥
शुभकाळ विशेषें प्रयाण कृत्यीं । हें तो विश्रुत सकळांतें ॥ ९६ ॥

हेंही बोलणें नाहीं प्रमाण । जयास नाहीं गमना गमन ॥
तयांस कोठून असेल निर्याण । मुहूर्त प्रयोजन काय त्या ॥ ९७ ॥

जयास धर्माधर्म बंधन । जाहलें सकल बंधोपशमन ॥
जयाचें प्राणास नाहीं उत्क्रमण । तयास निर्याण तें काय ॥ ९८ ॥

"ब्रम्हैवसन्ब्रम्हाप्येति" । ऐशिया साई महाराजा प्रती ॥
नाहीं आगती अथवा गती । निर्याण स्थिती कैंची त्यां ॥ ९९ ॥

असो उत्तर वा दक्षिणायन । करणेंच नाहीं जया प्रयाण ॥
ठायींच समरसती जयाचे प्राण । दीप निर्वाण समकाळें ॥ १०० ॥
देहतों आहे उसनवारी । पंचभूतांची सावकारी ॥
निजस्वार्थ साधलियावरी । परतणें माघारीं ज्याचा त्या ॥ १०१ ॥
या पुढील होणाराचें सूचक । आधींच बाबांनीं दाविलें कौतुक ॥
निघून गेली वेळ अमोलिक । कीर्ति स्थाईक राहिली ॥ १०२ ॥
ज्वर आलियाचें निमित्त । लौकिकीरीतीचा अनुकार करित ॥
कधीं कुंथत, कधीं कण्हत । सदैव सावचित्त अंतरीं ॥ १०३ ॥
दिवसा अष्ट घटका भरतां । निर्याण काळ निकट येतां ॥
उठून बैसले ते निजसत्ता । अविकळ चित्ता माझारीं ॥ १०४ ॥
पाहोनि बाबांची तयीं मुद्रा । भरती आली आशा समुद्रा ॥
कीं ती भयंकर वेळा अभद्रा । टळली समग्रां वाटलें ॥ १०५ ॥
असो यापरी करीत खंत । सर्व बसले असतां सचिंत ॥
पातला बाबांचा निकट अंत । घडला वृत्तांत परिसा तो ॥ १०६ ॥
क्षणैक अवकाश प्राणोत्क्रमणाला । नकळे काय आलें मनाला ॥
हस्त कफनीचे खिशांत घातला । ती धर्म वेळा जाणोनी ॥ १०७ ॥
लक्ष्मी नामें सुलक्षणी । नामा सारखी जिची करणी ॥
नित्य निरत जी साई चरणीं । ती संन्निधानीं तैं होती ॥ १०८ ॥
तिजला कांहीं द्रव्यदान । बाबा करीत अति सावधान ॥
क्षणांत होणार देहावसान । चुकलें कळून बाबांना ॥ १०९ ॥
हीच लक्ष्मीबाई शिंदे । बाबा पाशीं मशीदीमध्यें ।
अक्षयी कामाकाजा संबंधें । नेम निर्बंधें वर्ततसे ॥ ११० ॥

दिवसा नित्य हे परिपाटी । दरबार खुला सर्वांसाठीं ।
बहुशः कोणा न आडकाठी । मर्यादा मोठी रात्रीची ॥ १११ ॥
सायंकाळची फेरी जैं सरते । तेथून मंडळी घरोघर परते ॥
ती जंव दुसरे दिवशीं उजाडतें । तेव्हांच येते मशीदीं ॥ ११२ ॥

परी भगत म्हाळसापती । दादा लक्ष्मीयांची भक्ती ॥
पाहून तयांस रात्रीच्याही वक्तीं । मनाई नव्हती बाबांची ॥ ११३ ॥
हीच लक्ष्मी अति प्रीती । प्रत्यही पाठवी बाबांप्रति ॥
भाजी भाकर वेळेवरतां । सेवाही किती वानावी ॥ ११४ ॥
या भाकरीचा इतिहास परिसतां । कळूं सरेल बाबांची दयार्द्रता ॥
श्वान सूकरीं बाबांची ऐक्यता । आश्चर्य चित्ता होईल ॥ ११५ ॥
बाबा एकदां सायंकाळीं । भिंतीस टेकून वक्षस्थळीं ॥
वार्ता चालतां प्रेम समेळीं । लक्ष्मी आली ते स्थानीं ॥ ११६ ॥
तात्या पाटील जवळ होते । आणीक वरकड असतां तेथें ॥
लक्ष्मीनें अभिवंदिलें बाबांतें । बाबा तियेतें तंव वदती ॥ ११७ ॥
" लक्ष्मी लागलीसे भूक मातें " । बाबा मी भाकर घेऊनि येतें ॥
निघालें ही आतां आगितें । ऐसीच जातें माघारां ॥ ११८ ॥
ऐसें म्हणून निघून गेली । भाकऱ्या भाजून घेऊन परतली ॥
कोरड्या समवेत अविलंबें आली । सन्मुख ठेविली ती न्यहारी ॥ ११९ ॥
बाबांनीं तें पान उचललें । कुत्र्यासमोर तैसेंच मांडिलें ॥
बाबा हें काय आपण केलें । लक्ष्मीनें पुसिलें तात्काळ ॥ १२० ॥
मी जी इतुकी गेलें सत्वरीं । हातो हातीं भाजिल्या भाकरी ॥
तयांची ही काय नवल परी । श्वानाची खरी धन केली ॥ १२१ ॥

लागली होती तुम्हांस भूक । त्या भुकेचें हें काय कौतुक ॥
वदनीं सू दिला न एकही कुटक । लाविली चुटक उगा मज ॥ १२२ ॥
मग बाबा तियेस वदती । व्यर्थ कशाची करितेस खंती ॥
या कुत्र्याची जे उदरपूर्ती । माझीच तृप्ति ती जाण ॥ १२३ ॥
या श्वानाचा जीव नाहीं का । प्राणिमात्राच्या एकच भुका ॥
जरी तो मुका आणि मी बोलका । भेद असे का भुकेंत ॥ १२४ ॥
क्षुधेनें व्याकूळ जयाचे प्राण । तयांस देती जे अन्नावदान ॥
माझिया मुखींच तें सूदिलें जाण । सर्वत्र प्रमाण मानी हें ॥ १२५ ॥
प्रसंग सोपा व्यवहाराचा । बोध अवघा परमार्थाचा ॥
ऐसी उपदेशपर साईची वाचा । प्रेमरसाचा परिपाक ॥ १२६ ॥
बोलून सोपी प्रपंच भाषा । आंखीत परमार्थ रूपरेषा ॥
न काढितां कोणाच्या वर्मा दोषा । शिष्य संतोषा राखित ॥ १२७ ॥
तेथुनिया उपदेशानुसार । सुरू झाली लक्ष्मीची भाकर ॥
करून ठेवी दुग्धांत कुस्कर । प्रेम पुरस्सर प्रत्यहीं ॥ १२८ ॥
पुढें बाबाही भक्तिप्रेमें । भाकर ती खाऊं लागले नियमें ॥
वेळीं होता विलंब न करमे । जेवण न गमे बाबांस ॥ १२९ ॥
होतां लक्ष्मीच्या भाकरीस वेळ । जरी पात्रें तैं वाढिलीं सकळ ॥
जेवावयाचा टळेना काळ । मुखीं न कवळ घालीत ॥ १३० ॥
निवून जाईल पात्रीचें अन्न । भुकेनें बसतील खोळंबून ॥
परी लक्ष्मीची भाकर आलियावीण । अन्न सेवन होईना ॥ १३१ ॥
पुढें कांहीं दिवस वरी । बाबांनीं प्रत्यही तिसरे प्रहरीं ॥
शेवया मागवाव्या लक्ष्मीच्या करीं । सेवाव्या शेजारीं बैसून ॥ १३२ ॥

बाबा सेवित अति परिमित । शेष राधाकृष्णेस देत ॥
याच लक्ष्मीचे हस्तें देववित । उच्छिष्टप्रीत बहु तिजला ॥ १३३ ॥

असतां चालली देहविसर्जन वार्ता । ही भाकरीची भाकडकथा ॥
किमर्थ ऐसें न म्हणीजे श्रोतां । साई व्यापकता निदर्शक हे ॥ १३४ ॥

हें सकल दृश्य चराचर । याच्याही पैल परात्पर ॥
साई भरलासे निरंतर । जो अज अमर तो साई ॥ १३५ ॥

हें एक तत्व या कथेच्या पोटीं । ऐसीही गोड लक्ष्मीची गोटी ॥
सहज स्मरली उठाउठी । श्रोतयांसाठींच मी मानें ॥ १३६ ॥

असो ऐसी लक्ष्मीची सेवा । कैसा विसर साईस व्हावा ॥
सावधानाचा काय नवलावा । वृत्तांत परिसावा सादरता ॥ १३७ ॥

जरी आला कंठी प्राण । शरीर विगळित नाहीं त्राण ॥
बाबा निजहस्तें करिती दान । देहावसान समयीं तिस ॥ १३८ ॥

एकदां पांच एकदां चार । रुपये खिशांतून काढूनि बाहेर ॥
ठेवींत तियेचे हातांवर । तीच कीं अखेर बाबांची ॥ १३९ ॥

कीं ही नवविधा भक्तीची खूण । किंवा नवरात्र अंबिका पूजन ॥
झालें आज आहे शिलिंगण । सीमोल्लंघन दक्षिणाही ॥ १४० ॥

किंवा श्रीमद्भागवतीं । श्रीकृष्णें कथिलीं उद्धवाप्रती ॥
ती नवलक्षण शिष्यस्थिति । तियेची स्मृती देत बाबा ॥ १४१ ॥

एका दशाच्या दशमोध्यायीं । षष्टम श्लोकाची पहा नवायी ॥
शिष्यें कैसी करावी कमाई । कवण्या उपायीं वर्तावें ॥ १४२ ॥

आधीं पूर्वार्धीं कथिलीं पांच । उत्तरार्धीं चारचिसाच ॥
बाबा ही धरिती क्रम असाच । वाटे जणु हाच हेतु पोटीं ॥ १४३ ॥

अमानी दक्ष निर्मत्सर । शिष्य निर्मम गुरु सेवा पर ॥
असावा परमार्थ जिज्ञासातत्पर । निश्चल अंतर जयाचें ॥ १४४ ॥

जया ठावी नाहीं असूया । वाचा विग्ल पन करी न वाया ॥
इहीं लक्षणीं निजगुरुरावा । संतोषवाया । झटावें ॥ १४५ ॥

हाच श्रीसाईनाथाचा हेत । ऐसि या रूपीं व्यक्त करीत ॥
केवळ स्वकीय भक्त हितार्थ । करुणावंत संत सदा ॥ १४६ ॥

लक्ष्मी खाऊन पिऊन सधन । नवांची कथा काय तिजलागून ॥
तीही तितुके टाकील ओवाळून । तथापी तें दान अपूर्वतिस ॥ १४७ ॥

परमथोर भाग्यें आगळी । तेणेंच ऐसि या कृपेची नवाळी ॥
पावती झाली नवरत्नावली । निजकर कमळीं साईच्या ॥ १४८ ॥

गेले जातील किती से नव । परी हें दान अति अभिनव ॥
कीं जों तीचा जीवांतजीव । देईल का आठव साईची ॥ १४९ ॥

आलें सन्निध देहावसान । तरीही राखून अनुसंधान ॥
चारापांचाची सांगडघालून । आमरण स्मरण दिधलें तिस ॥ १५० ॥

ऐसा दावोनि सावधपणा । निकटवर्ती पाठविले भोजना ॥
मात्र ग्रामस्थांतील एका दोघांनां । बैसविताना देखिलें ॥ १५१ ॥

परी कांहीं प्रेमळ भक्तांनीं । हट्टचि धरिला कित्येकांनीं ॥
जाऊं नये बाबांपासुनि । वेळ ती कठिण मानुनी ॥ १५२ ॥

परि प्रसंगीं अंतसमयीं । पडेन काय मोहाचे अपायीं ॥
म्हणोनिया जणु घाई घाई । अवघियांहीं दवडिलें ॥ १५३ ॥

निर्याण समय निकट अति । जाणोनि बुट्टी काकादिकांप्रती ॥
बाबा वाडियांत जा जा म्हणती । भोजनांतीं मग यावें ॥ १५४ ॥

पाहोनि इतरांची ही व्यग्रता । बाबा दुश्चित्त निज चित्ता ॥
जा जा जेऊन या जा आतां । ऐसें समस्ता आज्ञापिती ॥ १५९ ॥

ऐसें हें नित्याचे सांगती । सखे अहर्निश निकटवर्ती ॥
जरी मनाची दुश्चित्तवृत्ति । आज्ञेनें उठती जावया ॥ १५६ ॥

आज्ञा तरी नुल्लंघवें । वेळीं सांनिध्यही न त्यागवे ॥
बाबांचें मनही न मोडवे । गेले वाडियां भोजना ॥ १६० ॥

भयंकर दुखण्याचें प्रमाण । कैंचे जेवण कैंचें खाण ॥
बाबापाशीं गुंतले प्राण । विस्मरण क्षण साहेना ॥ १६१ ॥

असो जाऊन जेऊं बैसलें । इतक्यांत मागून बोलावूं आले ॥
आर्धपोटींच धावत आले । तंव ते अंतरले भेटीला ॥ १६२ ॥

आयुर्दाय स्नेह सरतां । प्राणज्योती मंद होतां ॥
बयाजीचे अंकावरता । देह विश्रामता पावला ॥ १६३ ॥

नाहीं पडून वा निजून । स्वस्थपणें गादीसी बैसून ॥
ऐसा स्वहस्तें धर्म करून । केलें विसर्जन देहाचें ॥ १६४ ॥

समर्थाचे मनोगत । न होतां कोणासही अवगत ॥
देह विसर्जिला हातोहात । ब्रह्मीभूत जाहले ॥ १६५ ॥

घेऊनि देह मायेची बुंथी । संत सृष्टी माजी अवतरती ॥
होतां उद्धार कार्यपूर्ती । तात्काळ समरसती अव्यक्तीं ॥ १६६ ॥

नट धरीतो वेषनाना । अंतरीं पूर्ण जाणे आपणा ॥
तया अवतारीया परिपूर्णा । सांकडें मरणाचें तें काय ॥ १६७ ॥

लोक संग्रहार्थ जो अवतरला । कार्य संपतां अवतार संपविला ॥
तो काय जन्ममरणाचा अंकिला । विग्रह स्वलीला धरितो जो ॥१६८॥

---

१ श्रीमंत बापूसाहेब बुट्टी व काकासाहेब दीक्षितादि भक्तांस २ तेल
३ बयाजी आपा कोते ४ विश्रांती

परब्रह्म ज्याचें वैभव । तया कैचा निधनसंभव ॥
निर्ममत्व जयाचा अनुभव । कैचा भवाभव त्या बाधी ॥ १६९ ॥

दिसला जरी कर्मीं प्रवृत्त । कधीं न कर्में केलीं यत्किंचित ॥
सदा कर्मीं अकर्म देखत । अहंकार रहितत्वें ॥ १७० ॥

" नाभुक्तं क्षीयते कर्म " । हें तों स्मृत्युक्त कर्माचें वर्म ॥
परी ब्रह्मज्ञात्याचा न संभ्रम । देखे जो ब्रह्मचि वस्तुमात्रीं ॥ १७१ ॥

क्रियाकारक फलजात । हें तो अवघें प्रसिद्ध द्वैत ॥
तेंही ब्रह्मविद ब्रह्मचि मानित । जेवी का रजत शुक्तिके वरी ॥१७२ ॥

बाबा सारखी मायाळू जननी । पडली कैसी काळाचे वदनीं ॥
दिवसा ग्रासी अंधारी रजनी । तैसीच ही काहणी झाली कीं ॥१७३॥

आतां हा अध्याय संपवूं येथें । राखूं मासिक मर्यादेतें ॥
अति विस्तारें दुश्चित्ततेतें । ना तरी श्रोते पावतील ॥ १७४ ॥

पुढील अवशेष निर्याण कथा । येईल यथाक्रम पुढें परिसता ॥
शरण हेमाड साईसमर्था । पावला कृतार्था यत्कृपे ॥ १७५ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते । श्रीसाईनाथनिर्याणं नाम
द्वि चत्वारिंशोध्यायः संपूर्णः ॥
श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

सालमजकुरीं श्री साईबाबांच्या पुण्यतिथीचा शिर्डी येथील कार्यक्रम खालीलप्रमाणें ठरला आहे.

आश्विन शुद्ध १० शनिवार १६-१०-२६

| | |
|---|---|
| सकाळीं | रुद्राभिषेक<br>कीर्तन<br>आरती |
| दुपारीं | आराधनविधि<br>तीर्थप्रसाद |
| रात्रीं | चावडी |

आश्विन शुद्ध ११ रविवार १७-१०-२६

सकाळीं—पूजा आरति.

दुपारीं —भंडारा पुराण.

संध्याकाळीं—कीर्तन.

रात्रीं—रथाची मिरवणूक.

आश्विन शुद्ध १२ सोमवार १८-१०-२६

सकाळीं—कीर्तन व काला.

श्री साईलीलेंत जाहिराती घेण्याचें ठरविलें आहे. या पानावरील सर्व जागा जाहिरातीकरितां मोकळी आहे. जाहिरात देणारानें आमचेकडे पत्रव्यवहार करावा. खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

श्रीसाईनाथ सगुणोपासना किं. ८=

ह. भ. प. दासगणु कृत

संतलीलामृत

भक्तलीलामृत

गो. र. दाभोळकर

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें मुंबई नं. २०

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर, रंगाऱ्याची चाळ वांद्रें येथें मिळेल.

## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.